प्रशासकीय विषय क्रं. २१. ठराव क्रं. ३७. दिनांक -२०/०९/2022

प्रस्ताव-

लातूर शहर महानगरपालिका हददीमध्ये जाहिरातीकरीता लातूर महानगरपालिका जाहिरात धोरणास मान्यता देणे व Unipole करीता जागा निश्चित करण्यास व सदर जागेचे ई-लिलाव करण्यास मान्यता देणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या जागेमध्ये जाहिरात प्रदिर्शत करण्याकरीता विविध एजन्सीमार्फत Unipole उभारणेकरीता अर्ज आलेले आहेत. परंतू Unipole उभारणे बाबत जाहिरात धोरण निश्चित करणे व सदर पोल उभारणेच्या जागेची निवड करणे आवश्यक आहे. नगरविकास विभागाकडील दि. 09 मे 2022 रोजीच्या राजपत्रातील जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करणारे नियम अधिसूचनेनुसार सदर जाहिरात धोरण तयार करण्यात आले असून सदर धोरणास मान्यता देणे आवश्यक आहे. तसेच Unipole उभारणेकरीता निश्चित केलेल्या जागांना मान्यता देणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

ठराव :-

वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे जाहिरात प्रदर्शना बाबतचे जाहिरात धोरणास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच Unipole करीता जाहिरात धोरणानुसार जागा निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर जागा निश्चित मा. आयुक्त, मा. उपायुक्त (मालमत्ता) व विभाग प्रमुख यांच्याकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येतील यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर जागेचा ई-लिलाव करण्याकरीता मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

आयुक्त
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- २३ दिनांक २१.07.2022

प्रस्तावः-

विषयः-लातूर शहर महानगरपालिका शाळा क्र.9 मधील तीन कंत्राटी शिक्षकांना मुदतवाढ देणेबाबत

लातूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 9 मधील इयत्ता 9 वी 10 वीच्या वर्गासाठी कंत्राटी स्वरुपात नियुक्त असलेले सहशिक्षक 1. श्री. दिवे विलास माधवराव 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी यांना शैक्षणीक वर्ष सन 2021-22 साठी स्थायी समिती सभा दि. 18/06/2021 विषय क्र.(03) ठराव क्र.187 अन्वये दिनांक 30.04.2022 पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली होती. तरी उक्त तीन कंत्राटी सहशिक्षकांना शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी मूदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी शैक्षणीक वर्ष 2022-23 साठी उक्त कंत्राटी शिक्षकांना दि. 2 जुन 2022 ते 30 एप्रिल 2023 पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर.

निर्णयः-

लातूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 9 मधील इयत्ता 9 वी 10 वीच्या वर्गासाठी कंत्राटी स्वरुपात नियुक्त असलेले सहशिक्षक 1. श्री. दिवे विलास माधवराव 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी यांना शैक्षणीक वर्ष सन 2021-22 साठी देण्यात आलेली मूदत दि. 30.04.2022 रोजी संपली असल्याने शैक्षणीक वर्ष 2022-23 साठी उक्त तीन कंत्राटी शिक्षकांना दि. 2 जुन 2022 ते 30 एप्रिल 2023 पर्यंत मुदतवाढ देण्याबाबतच्या प्रस्तावास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांकः- 24 दि. 27/07/2022

प्रस्तावः-

विषयः- श्री.बसवराज नीलकंठ कलशेट्टी,कनिष्ठ अभियंता,पुणे महानगरपालिकेतून लातूर शहर महानगरपालिका, लातूर शहर अभियंता स्थापत्य यांचे पथक या विभागात कनिष्ठ अभियंता या पदावर कायमस्वरूपी बदली करणेबाबत.

विशेष कार्य अधिकारी मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचयांचे पत्र दि.6 मार्च 2022 नुसार श्री बसवराज निलकंठ कलशेट्टी, कनिष्ठ अभियंता, महानगरपालिका, पुणे येथुन लातूर शहर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदावर परस्पर संमतीने नियुक्ती देणे बाबत ना-हरकत पत्र मिळणेबाबत सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा असे मा.मंत्री महोदय यांचे निर्देशानुसार विनंती केली आहे.

पुणे महानगरपालिका, महानगरपालिका सभा ठराव, सभा क्रमांक 31, विषय क्रमांक 379, ठराव क्रमांक 54, दि.22/6/2021, श्री.बसवराज नीलंकठ कलशेट्टी, कनिष्ठ अभियंता, मलनिःस्सारण देखभाल दुरुस्ती विभागात कनिष्ठ अभियंता पदावर दि.19/01/2017 पासून कार्यरत आहे. पुणे महानगरपालिका आस्थापनेतून लातूर महानगरपालिकेत आस्थापनेत कनिष्ठ अभियंता पदावर परस्पर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन,नगर विकास विभागचा शासन निर्णय क्रमांक लामनपा/212/261/ प्र.क्र.40/नवि-24 दि.28 मे 2013 च्या आदेशाने सहपत्र क्र.1 ते 22 मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार एकूण 1246 पदांचा आकृतीबंध नवनिर्मित लातूर शहर महानगरपालिकेकरीता मंजूर करण्यात आला आहे.सदर आकृतीबंधात शहर अभियंता स्थापत्य यांचे पथक मध्ये कनिष्ठ अभियंता -5 पदे (वेतनश्रेणी 9300-34800, ग्रेड पे-4300) मंजूर आहेत व ते सध्या रिक्त आहेत.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः- लामनपा –2016/प्र.क्र.113 /नवि-24, दि.19 सप्टेंबर 2019 अन्वये लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम 2019 ला शासन मान्यता दिलेली आहे व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाची अधिसूचना राजपत्र असाधारण क्रमांक 392, दि.02/11/2019 लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम 2019, राजपत्रात प्रसिध्द केले आहेत.

कनिष्ठ अभियंता – 5 पदे सेवा प्रवेश नियम, 2019 नेमणूकीचे पध्दत व टक्केवारी मध्ये नामनिर्देशन/ सरळसेवा 75% व पदोन्नती- 25% दर्शविलेली आहे. नामनिर्देशन/ सरळसेवा - 75% पदाप्रमाणे 4 पदे सरळसेवेसाठी मंजूर आहे. सदर 4 पदे रिक्त असल्याने बिंदुनामावलीनुसार त्यांचे आरक्षण पुढीलप्रमाणे सहाय्यक आयुक्त (मावक) औरंगबाद यांनी प्रमाणित करुन दिले आहे. 1-अनुजाती, 1-विजाअ, 2- अराखीव आहेत.

मंजूर सेवाप्रवेश नियमावलीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) अ.क्र.12 मध्ये नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती खालीलप्रमाणे आहे.

1. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी.
2. नेमणुकीनंतर 3 वर्षात कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.
3. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

तसेच सेवा प्रवेश नियम, 2019 मधील अ.क्र.9 मध्ये एका महानगरपालिकेतुन दुस-या महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती बाबत तरतुद आहे.

तरी महानगरपालिका, पुणे येथुन लातूर शहर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता पदावर परस्पर संमतीने नियुक्ती देणे बाबत ना-हरकत पत्र देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

निर्णयः-

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिकेकरीता मंजूर आकृतीबंधातील शहर अभियंता स्थापत्य यांचे पथक मध्ये कनिष्ठ अभियंता -5 पदे (वेतनश्रेणी 9300-34800, ग्रेड पे-4300) मंजूर असून, सेवा प्रवेश नियम, 2019 अन्वये नामनिर्देशन/ सरळसेवा - 75% पदाप्रमाणे 4 पदे सरळसेवेसाठी मंजूर आहेत. सदर 4 पदे रिक्त असल्याने बिंदुनामावलीनुसार त्यांचे आरक्षण पुढीलप्रमाणे सहाय्यक आयुक्त (मावक) औरंगबाद प्रमाणित केले आहेत.1-अनुजाती,1-विजाअ, 2- अराखीव आहेत. श्री.बसवराज नीलंकठ कलशेट्टी, कनिष्ठ अभियंता, महानगरपालिका, पुणे, मलनिःस्सारण देखभाल दुरुस्ती विभागात कनिष्ठ अभियंता यांनी सेवा प्रवेश नियम, 2019 मधील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदासाठी नमुद केलेली शैक्षणिक अर्हता पुर्ण करत असेल तर व बिंदुनामावली नुसार रिक्त आरक्षण पदानुसार त्यांचे प्रवर्ग असेल तर त्यांना लातूर शहर महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता स्थापत्य या पदावर या वेतनश्रेणी 9300-34800, ग्रेड पे-4300 मध्ये सामावुन घेण्यास समती देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकाय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 95 दि. 29/7/2022

विषय - स्क्रॅप मार्केट येथे 1 TPD बायोगॅस उभारणेच्या कामाबाबत.

प्रस्ताव -

लातूर शहरामध्ये कच-यावर प्रक्रिया करुन 5 TPD क्षमतेच्या दोन बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी शासन निर्णय क्रं. स्वच्छता महाराष्ट्र अभियान 2018 प्रकरण क्रं. 175 नगर विकास विभाग 34 दिनांक 08 फेब्रुवारी 2022 अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. प्रकल्पाची एकुण किंमत 4.02 कोटी आहे. दोन प्रकल्पापैकी वरवंटी कचरा डेपो येथे 2.01 कोटी 5 TPD क्षमतेच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत 3 TPD प्रकल्प हे लातूर शहरामध्ये विविध तीन ठिकाणी 1 TPD क्षमतेचे उभारणे आहे. त्यापैकी 1 TPD क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प गांधी चौक येथे उभारणे आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

निविदा सुचना क्रं. 4 / 2022
निविदा ID No. 2022_LMC_780113_1
निविदा मागविण्याचा दिनांक 14.03.2022 ते 07.04.2022
निविदा उघडणेचा दिनांक 08.04.2022

स्क्रॅप मार्केट येथे 1 TPD क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प उभारणेच्या कामासाठी अंतिम दिनांक दिवशी एकुण 4 निविदा प्राप्त झाले. सदरील निविदा प्राप्त निविदांचा तांत्रिक लिफाफा दिनांक 08.04.2022 रोजी उघडण्यात आला. निविदा धारकांनी सादर केलेले कागदपत्र निविदा समितीने छाननी करुन 3 निविदा वैद्य असल्याचा अभिप्राय दिला. त्यानंतर निविदेचा अर्थिक लिफाफा उघडण्यांत आला. निविदाधारकांच्या प्राप्त दराचा तपशिल खालील विवरणामध्ये आहे.

अ.क्रं.	निविदाधारकाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	MD इंजिनीअर्स, नांदेड	56,92,988.086	-2.200% कमीने म्हणजे रक्कम रु. 55,67,742.348
2	शिवकृपा कन्स्ट्रक्शन, नांदेड		-4.00% कमीने म्हणजे रक्कम रु. 54,65,268.563
3	सायुज्य उर्जा, प्रा. लि., नांदेड		-5.00% कमीने म्हणजे रक्कम रु. 54,08,338.682

वरीलप्रमाणे एकुण 3 निविदाचे दर प्राप्त झाले आहेत. तीन निविदा दरापैकी सर्वात कमीचे दर हे संयुजा ऊर्जा यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 56,92,988.086 पेक्षा -5.00 % कमीचे म्हणजेच 5408338.682 रु. आहेत. तरी प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा सायुज्य ऊर्जा, प्रा. लि., नांदेड यांची आहे.

निर्णय :- लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत गांधी चौक येथे 1 TPD क्षमतेच्या बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दर सायुज्य उर्जा, प्रा.लि. नांदेड यांचे -5% म्हणजे रक्कम रु. 54,08,338.682 दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकाय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 26 दि. 29/4/2022

विषय - गांधी चौक येथे 1 TPD बायोगॅस उभारणेच्या कामाबाबत.

प्रस्ताव -

लातूर शहरामध्ये कच-यावर प्रक्रिया करुन 5 TPD क्षमतेच्या दोन बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी शासन निर्णय क्रं. स्वच्छता महाराष्ट्र अभियान 2018 प्रकरण क्रं. 175 नगर विकास विभाग 34 दिनांक 08 फेब्रुवारी 2022 अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. प्रकल्पाची एकुण किंमत 4.02 कोटी आहे. दोन प्रकल्पापैकी वरवंटी कचरा डेपो येथे 2.01 कोटी 5 TPD क्षमतेच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत 3 TPD प्रकल्प हे लातूर शहरामध्ये विविध तीन ठिकाणी 1 TPD क्षमतेचे उभारणे आहे. त्यापैकी 1 TPD क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प गांधी चौक येथे उभारणे आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

निविदा सुचना क्रं. 4 / 2022
निविदा ID No. 2022_LMC_780092_1
निविदा मागविण्याचा दिनांक 14.03.2022 ते 07.04.2022
निविदा उघडणेचा दिनांक 08.04.2022

गांधी चौक येथे 1 TPD क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प उभारणेच्या कामासाठी अंतिम दिनांक दिवशी एकुण 4 निविदा प्राप्त झाले. सदरील निविदा प्राप्त निविदांचा तांत्रिक लिफाफा दिनांक 08.04.2022 रोजी उघडण्यात आला. निविदा धारकांनी सादर केलेले कागदपत्र निविदा समितीने छाननी करुन 3 निविदा वैद्य असल्याचा अभिप्राय दिला. त्यानंतर निविदेचा अर्थिक लिफाफा उघडण्यांत आला. निविदाधारकांच्या प्राप्त दराचा तपशिल खालील विवरणामध्ये आहे.

अ.क्रं.	निविदाधारकाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	MD इंजिनीअर्स, नांदेड	56,92,988.086	-2.200% कमीने म्हणजे रक्कम रु. 55,67,742.348
2	शिवकृपा कन्स्ट्रक्शन, नांदेड		-4.00% कमीने म्हणजे रक्कम रु. 54,65,268.563
3	सायुज्य उर्जा, प्रा. लि., नांदेड		-5.00% कमीने म्हणजे रक्कम रु. 54,08,338.682

वरीलप्रमाणे एकुण 3 निविदाचे दर प्राप्त झाले आहेत. तीन निविदा दरापैकी सर्वात कमीचे दर हे संयुजा ऊर्जा यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 56,92,988.086 पेक्षा -5.00 % कमीचे म्हणजेच 5408338.682 रु. आहेत. तरी प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा सायुज्य ऊर्जा, प्रा. लि., नांदेड यांची आहे.

निर्णय :- लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत गांधी चौक येथे 1 TPD क्षमतेच्या बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दर सायुज्य उर्जा, प्रा.लि. नांदेड यांचे -5% म्हणजे रक्कम रु. 54,08,338.682 दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकाय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 27 दि. 29/11 / 2022

विषय - फ्रुट मार्केट येथे 1 TPD बायोगॅस उभारणेच्या कामाबाबत.

प्रस्ताव -

लातूर शहरामध्ये कच-यावर प्रक्रिया करुन 5 TPD क्षमतेच्या दोन बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी शासन निर्णय क्रं. स्वच्छता महाराष्ट्र अभियान 2018 प्रकरण क्रं. 175 नगर विकास विभाग 34 दिनांक 08 फेब्रुवारी 2022 अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. प्रकल्पाची एकुण किमत 4.02 कोटी आहे. दोन प्रकल्पापैकी वरवंटी कचरा डेपो येथे 2.01 कोटी 5 TPD क्षमतेच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत 3 TPD प्रकल्प हे लातूर शहरामध्ये विविध तीन ठिकाणी 1 TPD क्षमतेचे उभारणे आहे. त्यापैकी 1 TPD क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प गांधी चौक येथे उभारणे आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

निविदा सुचना क्रं. 4 / 2022
निविदा ID No. 2022_LMC_780072_1
निविदा मागविण्याचा दिनांक 14.03.2022 ते 07.04.2022
निविदा उघडणेचा दिनांक 08.04.2022

फ्रुट मार्केट येथे 1 TPD क्षमतेचे बायोगॅस प्रकल्प उभारणेच्या कामासाठी अंतिम दिनांक दिवशी एकुण 3 निविदा प्राप्त झाले. सदरील निविदा प्राप्त निविदांचा तांत्रिक लिफाफा दिनांक 08.04.2022 रोजी उघडण्यात आला. निविदा धारकांनी सादर केलेले कागदपत्र निविदा समितीने छाननी करुन 2 निविदा वैद्य असल्याचा अभिप्राय दिला. त्यानंतर निविदेचा अर्थिक लिफाफा उघडण्यंत आला. निविदाधारकांच्या प्राप्त दराचा तपशिल खालील विवरणामध्ये आहे.

अ.क्रं.	निविदाधारकाचे नांव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	MD इंजिनीअर्स, नांदेड	56,92,988.086	-2.11% कमीने म्हणजे रक्कम रु. 55,72,866.037
2	सायुज्य उर्जा, प्रा. लि., नांदेड		-5.00% कमीने म्हणजे रक्कम रु. 54,08,338.682

वरीलप्रमाणे एकुण 3 निविदाचे दर प्राप्त झाले आहेत. तीन निविदा दरापैकी सर्वात कमीचे दर हे संयुजा ऊर्जा यांचे अंदाजपत्रक रक्कम रु. 56,92,988.086 पेक्षा -५ % कमीचे म्हणजेच 5408338.682 रु. आहेत. तरी प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा सायुज्य ऊर्जा, प्रा. लि., नांदेड यांची आहे.

निर्णय :- लातूर शहर महानगरपालिका, लातूर अंतर्गत गांधी चौक येथे 1 TPD क्षमतेच्या बायोगॅस प्रकल्प उभारणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दर सायुज्य उर्जा, प्रा.लि. नांदेड यांचे -5% म्हणजे रक्कम रु. 54,08,338.682 दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 28 **दिनांक 12/04/2022**

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन अंतर्गत मलनिःस्सारण प्रकल्प योजना खंड-३८ व अतिरीक्त बाब दरसुची क्रं. १ वाढीव कामास मंजुरी बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन अंतर्गत शहराच्या उत्तरेकडील ३२ द.ल.ली. क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्रासाठी ३२ द.ल.ली. क्षमतेचा STP व त्या अनुषंगीक टंकमेनच्या कामासाठी रु. ५८,६८,३०,९३४/- किमतीच्या कामाचे कार्यादेश मे. जय वरुडी इन्फ्राकॉन प्रा. लि., अहमदाबाद यांना दिले आहे.

अमृत अभियानांतर्गत लातूर महानगरपालिकेस रु. १३९.४२ कोटी किमतीचा मलनिःस्सारण प्रकल्प मंजुर करण्यांत आलेला आहे. सदर योजने मध्ये ४१.४० कि.मी. टंकमेन, ३ वेटवेल, ३.२ कि.मी. पंपींग मेन, पंपिंग मशिनरी व २ मलशुध्दीकरण केंद्र यांचा समावेश होता. सदर प्रकल्पामधील ३२ MLD या क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्राची जागा बदलल्यामुळे टंकमेन लांबी मध्ये ९.२ कि.मी. ची वाढ झाली आहे. कार्यवाही सर्वेक्षणा प्रमाणे सुधारित संकल्पनात बदल झाल्यामुळे काही ठिकाणी डेप्थ कमी झाल्या आहेत. मात्र दुस-या ४० MLD मलशुध्दीकरण केंद्राची जागा महानगरपालिकेस चार वर्षानंतरही उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे व ३२ मलशुध्दीकरण केंद्राच्या जागेमध्ये बदल झाल्यामुळे मुळ मंजुर प्रकल्पातील काही बाबींमध्ये बचत झालेली असुन काही घटकांमध्ये वाढीव खर्च येणार आहे. त्यानुसार तांत्रिक बदलाचा प्रस्ताव अमृत अभियानाचे PMC म्हणुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तपासुन त्यांच्या दि. १२ ऑक्टोबर २०२१ च्या पत्रान्वये राज्यस्तरीय तांत्रिक समितीसमोर सादर केला होता. त्यामध्ये काही अटींसह सुधारित गोषवारा तक्त्याच्या अधारे प्रकल्पाची सुधारित किमत रु. ८२.६२२३ कोटी इतकी होत असुन प्रकल्पामध्ये एकुण रु. ५६.७९९७ कोटी इतकी बचत होत आहे. परिणामी येणा-या सुधारित रु. ८२.२३ कोटी इतक्या सुधारित प्रकल्प किमतीस शासनाकडुन संदर्भ क्रं. 2 अन्वये मान्यता देण्यात आली.

तसेच सुधारित तांत्रिक बदलाचा प्रस्तावास मान्यता मिळणे करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,लातूर यांना प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तद्नंतर अतिरीक्त बाब दरसुची क्रं. १ च्या प्रस्तावातील रु. ७,५२,२४,९४४/- रक्कमेच्या व खंड-38 अंतर्गत वाढीव परिमाणाच्या प्रस्तावातील एकुण रु. ४,७६,७८,०१४/- रक्कमेच्या बाबीस तांत्रिक सहमती मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी तांत्रिक सहमती दिली आहे. तसेच अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण लातूर यांनी अतिरीक्त बाब दरसुची क्रं. १ व खंड-३८ अंतर्गत वाढीव परिमाणास तांत्रिक सहमती प्राप्त झाल्याचे पत्राद्वारे कळविले आहे.

तरी उपरोक्त अतिरीक्त बाब दरसुची क्रं. १ च्या प्रस्तावातील रु. ७,५२,२४,९४४/- (Excluding G.S.T.) रक्कमेच्या व खंड-38 अंतर्गत वाढीव परिमाणाच्या प्रस्तावातील एकुण रु. ४,७६,७८,०१४/- (Excluding G.S.T.) रक्कमेच्या सुधारितरकमेस केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीतुन प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

निर्णय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन अंतर्गत मलनिःस्सारण प्रकल्प योजना खंड-३८ व अतिरीक्त बाब दरसुची क्रं. १ वाढीव कामाच्या रकमेस मंजुरी देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 29 दि. 17 / 8 / 2022

विषय - हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे या कामाचे वाढीव रक्कमेस **मनपा फंड** अंतर्गत प्रशासकीय मान्यता देणे बाबत.

प्रस्ताव -

लातूर शहर पाणी पुरवठा योजना, हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे या कामाचे आदेश क्रं. 3781 दिनांक 08.06.2022 रोजी व्रज कन्स्ट्रक्शन, अहमदाबाद यांना देण्यात आले आहेत. अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार गोकक, कर्नाटक येथून घेणे प्रस्तावित होते. परंतू कर्नाटक राज्यात खोदकामावर बंदी असल्यामुळे तेथुन फिल्टर मिडीया आणणे शक्य झाले नाही. सदरचा फिल्टर मिडीया गोदरा, गुजरात राज्यातुन घेणेसाठी साधारणतः 400 कि.मी. जास्तीचे अंतर होत असल्याने अंदाजपत्रकीय दरानुसार रक्कम रु. 66,46,403/- जास्तीचे होत आहे.

मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना प्रशासकीय मान्यतेकरिता वाढीव प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावास वाढीव मंजुरी मिळाली नसले कारणाने **मनपा फंड** अंतर्गत प्राप्त होणा-या अनुदानातुन वाढीव रक्कम रु. 66,46,403/- यास प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

निर्णय :- हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथील फिल्टर बेड मधील फिल्टर मिडीया बदलणे या कामाचे वाढीव रक्कमेस **मनपा फंड** अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येते. (66,46,403/-) (विकास शुल्क / गुंठेवारी आकार)

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांकः- 30 दिनांक 25.08.2022

प्रस्तावः-

विषयः- जनाधार सेवाभावी संस्था घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाच्या कालावधी बाबत .

अध्यक्ष जनाधार सेवाभावी संस्था, लातूर यांचे पत्र जे-७६ दिनांक/२३-२०२२/.एस.ए.०१ २०२२/०८/अन्वये घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाच्या कालावधीबाबत संस्थेच्या कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याने कामगारांचे मनोधैर्य खचत असल्याने संस्थेच्या कामासंदर्भात ५+२ वर्षाचा कालावधी आहे असे स्पष्टीकरण व्हावे अशी विनंती केलेली आहे .

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाच्या कालावधी बाबत सदर कामाच्या कार्यारंभ आदेशामध्ये दिनांक - २०/०९/१४१७ च्या पत्रामधील मुद्दा क्र. 6 मध्ये उल्लेख केलेल्या कालावधी(5+2) असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या निवीदेमध्ये Article-4 Condition of Contract मध्ये पान क्र. 24 अनुक्रमांक 4 मध्ये The Work Period offered is for 7 Years, from the date of agreement असा उल्लेख असून निविदेमध्ये ५+२ वर्षाचा कालावधी नमूद असून सदर कामाच्या कार्यारंभ आदेशामध्ये (५+२ वर्ष) (कार्यारंभ आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून)असा उल्लेख आहे.

सर्वसाधारण सभा दिनांक 25/05/2022 ठराव क्रमांक 248 नुसार घनकचरा व्यवस्थापनाचे काम करणा-या संस्थेसोबतचा करारनामा रद्द करण्यास मंजूरी देण्यात आली असून करारनाम्यातील अटीनुसार 180 दिवसांची नोटीस देण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे, तथापि सदर संस्था लातूर शहर महानगरपालिकेकडे घनकचरा व्यवस्थापनाचे काम मागील पाच वर्षापासून करत असून कामकाज ठिक आहे. सदर संस्थेचा करारनामा रद्द करुन नविन अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मंजूरी इ.प्रक्रियेसाठी बराच अवधी लागणार आहे आणि शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे काम महानगरपालिकेची उपलब्ध यंत्रणा मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे सद्यस्थितीत तरी शक्य होणार नाही

करीता जनाधार सेवाभावी संस्थेसोबत महानगरपालिकेने केलेल्या कार्यादेशाप्रमाणे मागील पाच वर्षापासून काम करत असल्याने करारनाम्यातील अटीनुसार शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे कामकाज पुढील दोन वर्षापर्यंत करण्यास मान्यता देणे योग्य राहणार आहे. तरी पुढील दोन वर्ष मुदतीपर्यंत जनाधार सेवाभावी संस्थेस घनकचरा व्यवस्थापनाचे काम करण्यास मान्यता देणेबाबत निर्णय घेणेसाठी मान्यतेसाठी सादर.

निर्णयः-

जनाधार सेवाभावी संस्थेसोबत महानगरपालिकेने केलेल्या कार्यादेशाप्रमाणे सदर संस्था मागील पाच वर्षापासून शहरात घनकचरा व्यवस्थापानाचे काम व्यवस्थितरित्या करत असल्याने करारनाम्यातील अटीनुसार शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे कामकाज समाधानकारक होत असल्याने तसेच महानगरपालिकेकडे तातडीने पर्यायी यंत्रणा उपलब्ध होणार नसल्याने सदर संस्थेस घनकचरा व्यवस्थापानाचे काम करण्यास पुढील दोन वर्षापर्यंत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 31 दिनांकः-25.08.2022

प्रस्तावः-

विषयः- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103, 104 व लेखा संहिता 2011 चे नियम 426 अन्वये अर्थसंकल्पाचे पुनर्विनियोजनास मान्यता प्रदान करणेबाबत

लातूर शहर महानगरपालिकेच्या सन 2022-23 च्या अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षकात अंदाजपत्रकीय तरतूद भविष्यात होणा-या कामाच्या तुलनेने कमी असल्याने तसेच शादीखाना (शाहु चौक) या लेखाशिर्षकात निधी लागणा-या रक्कमेपेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103, 104 व लेखा संहिता 2011 चे नियम 426 चे सोबत जोडण्यात आलेल्या नमुना क्रमांक 90 अन्वये सदरील अर्थसंकल्पीय पुनर्विनियोजन करण्यात येत आहे.

नमुना क्रमांक 90

(नियम क्रमांक 426 पहा)

अर्थसंकल्पीय पुनर्वियोजनाचे विवरणपत्र

अ.क्र.	पासुन					ते						शेरा
	प्रधान गौण व सविस्तर शीर्षक	कामांची सेवा इत्यादी	मुळ निधी	आज पर्यंतचा खर्च	उपलब्ध असलेली शिल्लक	प्रधान गौण व सविस्तर शीर्षक	कामांची सेवा इत्यादी	मुळ निधी	आज पर्यंतचा खर्च	उपलब्ध असलेली शिल्लक	रक्कमेतील प्रस्तावित वाढ	
1	रु- महसूली मांडवली खर्च	शादीखाना (शाहुचौक)	५.०० कोटी	१.०० कोटी	३.०० कोटी	रु- महसूली मांडवली खर्च	घनकचरा व्यवस्थापन	८.०० कोटी	७.८४ कोटी	०.१६ कोटी	३.०० कोटी	सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने शहरात साधारण पसरण्याची शक्यता असल्याने. घनकचरा व्यवस्थापनाचे कामाचे देयके देणे अत्यावश्यक असले बाबत निदर्शनास आहे

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103, 104 व लेखा संहिता 2011 चे नियम 426 चे उक्त नमुना क्रमांक 90 नुसार करण्यात आलेल्या सदरील अर्थसंकल्पीय पुनर्विनियोजनास मान्यता प्रदान करणेबाबत निर्णय घेणेकरीता प्रस्ताव सादर

निर्णयः-

लातूर शहर महानगरपालिकेच्या सन 2022-23 च्या अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षकात अंदाजपत्रकीय तरतूद भविष्यात होणा-या कामाच्या तुलनेने तरतूद कमी असल्याने तसेच शादीखाना (शाहु चौक) या लेखाशिर्षकात अतिरीक्त निधीची अंदाजपत्रकीय तरतूद असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

अधिनियम 1949 चे कलम 103, 104 व लेखा संहिता 2011 चे नियम 426 चे नमुना क्रमांक 90 अन्वये सादर अर्थसंकल्पीय पुनर्विनियोजन प्रस्तावास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

57

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दिनांकः 30/08/2022

प्रशासकीय ठराव क्र. 32 अग्निशमन विभागाकरिता ठेका पध्दतीवर "प्रशिक्षित अग्निशामक [Fireman] आणि वाहन चालक ऑपरेटर [Driver Opreator] घेणेत आले आसता आजतागायत पारीत झालेल्या देयकास कार्योत्तर मान्यता व सदर कामास मुदत वाढ मिळणे बाबत.

प्रस्तावः-

वरील संदर्भिय विषयानुसार इःतपर अहवाल सादर करण्यात येतो की,अग्निशमन विभागाकरिता 96 पदे आस्थापनावर मंजूर आहेत. परंतू आज तारखेला केवळ 02 लीडींग फायरमन कर्मचारी मूळ आस्थापनेवर अग्निशमन विभागात कार्यरत आहेत.आणि इतर विविध विभागातील 18 कर्मचारी असे एकूण 20 कर्मचारी कार्यरत आहेत या विभागाचे MIDC परिसरातील अग्निशमन मुख्यालया व्यतिरिक्त गांधी चौक पाणी टाकी येथे अग्नि.केंद्र कार्यरत आसुन वरील कर्मचारी विभागून दोन्ही ठीकाणी तीन शिफट मध्ये काम करतात.

सध्य स्थितीत L-1 म्हणजेच **Bay Leaf Business Services Pvt. Ltd. Latur.** यांचे दर सर्वात कमीचे असल्याने त्यांना मा.आयुक्त मनपा. यांची मान्यता दिनांक 04.03.2020 अन्वये दि.13.03.2020 प्रमाणे (दि.01.04.2020 ते 30.06.2020) या कालावधी करिता पूरवठा आदेश देण्यात आले व त्यानंतर कार्यालयीन आदेश जा.क्र.4098 दिनांक 08.07.2020 अन्वये दि.07.07.2020 पासुन पूढील एक महीन्यासाठी मुदतवाढीचे आदेश देण्यात आले व नंतर मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक 26.06.2020 अन्वये पूढील कालावधीच्या निर्णया करिता मा.स्थाई स्मीती साठी विषय सादर करणेत आले व उक्त कामासाठी मा.स्थाई समीती सभा होवून कार्योत्तर मान्यता व नविन कार्यादेश निर्गमित होईपर्यंत मा.आयुक्त यांची मान्यता मुळ संचिकेतील टिपणी क्र.84 दिनांक 30.07.2020 प्रमाणे झालेली आहे.

तसेच मध्यंतरी कोविडमुळे बराच कालावधी स्थाई समिती सभा झाली नाही व तदनंतर स्थाई सभेत मुदतवाढी बाबत निर्णय झालेला नाही.तदनंतर मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अहवाल माहे 08.08.2020 ते आजतागायत पारीत झालेल्या देयकास कार्योत्तर मान्यता व सदर कामास मुदतवाढ प्राप्त झाल्यानंतरच देयक पारीत करणेत यावे आसे सुचना केले आहेत.

तरी प्रस्तावित प्रस्तावाप्रमाणे आवश्यतेनुसार लागणारा मणूष्यबळ पूरवठा करिता मा.लेखापरिक्षक यांच्या अहवाला नुसार 08.08.2020 ते आजतागायत पारीत झालेल्या देय्यकास कार्योत्तर मान्यता व सदर कामास पूढील कर्मचारी भरती प्रक्रीया होइपर्यंत मुदत वाढ मिळणे बाबतच्या निर्णयास्तव सादर.

निर्णयः- अग्निशमन विभागाकरिता ठेका पध्दतीवर **Bay Leaf Business Services Pvt. Ltd. Latur.**या कंपनीचे " प्रशिक्षित अग्निशामक [Fireman] 15 आणि वाहन चालक ऑपरेटर [Driver Opreator] " 06 कार्यरत आसलेल्या उमेदवारांना मा.लेखापरिक्षक यांच्या अहवाला नुसार **Bay Leaf Business Services Pvt.Ltd.** या कंपनीस माहे 08.08.2020 ते आजतागायत पारीत झालेल्या देय्यकास कार्योत्तर मान्यता देण्यात येते व सदर कामास पूढील कर्मचारी भरती प्रक्रीया होईपर्यंत किंवा एक (01) वर्ष,जे कमी आसेल तोपर्यंत मुदत वाढ देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक 33

दिनांक 30/08/२०२२

प्रस्तावः-

लातूर शहर म.न.पा. हद्दीतील अनियमित भुखंडास गुंठेवारी विकास नियामाधीन करणेसाठी एक वर्षाची मुदतवाढ मिळणेकरिता विचार विनिमय करून निर्णय घेणे बाबत.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.अनबां-१०२०/४८०/प्र.क्र/७९/२०००/भाग-२० दि.०५/०५/२००१ लागू केलेला आहे.तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक १२ मार्च २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण)अधिनियम २००१ यांच्या कलम ३ मधील पोट- कलम १ मध्ये १ जानेवारी २००१ रोजी या मजकुराऐवजी ३१ डिसेंबर २०२० रोजी दाखल करण्यात आलेली आहे.त्यामुळे अधिनियमतील कलम ४(१) नुसार हा अधिनियम अमंलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यात आत किंवा नियोजन प्राधिकरण परवानगी देईल अशा वाढवून दिलेल्या मुदतीत संबधित भुखंडधारक गुंठेवारी विकास नियमाधीन अर्ज करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.सर्वसाधरण सभा मध्ये ठराव क्रं.२१५ अन्वये दि.२८/०२/२०२२ रोजी फक्त सहा महिन्या पर्यंत मुदत देणेत आलेली आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी,लातूर यांनी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ ची अधिसुचना दि.१२/०३/२०२१ रोजीच्या अधिसुचनेच्या नमुद नियामांचे पालन करणेसाठी दि.३१/०९/२०२१ रोजी परिपत्रक काढण्यात आले आहे.त्यामध्ये मुद्दया नुसार महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ च्या अधिसुचनेनुसार ३१ डिसेंबर २०२० पर्वतचे भुखंड/ प्लॉटची उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून नियमानुसार मोजणी करून घेणे बांधनकारक केले आहे.त्यामुळे अधिनियमतील कलम ४(१) नुसार प्राप्त प्रकरणातील अर्जान्वये भुखंडधारकास उपअधिक्षक भूमी अभिलेख,लातूर यांच्याकडून मोजणी करून अणण्यास नियमानुसार पत्र देण्यात येत आहेत.परिपत्रका नुसार भुखंडाचे / प्लॉटचे दर निश्चीत केलेले आहेत.त्याप्रमाणे भुखंडधारक हे मोजणीची फिसचा भरणा करून मोजणी करून घेत असल्याने मोजनीस साधारणाः तीन ते चार महिने वेळ लागत असल्याने प्रस्ताव हे प्रलंबित राहत आहेत.मा.सवर्साधरण ठराव क्र.२१५ प्रमाणे मुदतवाढ हि दि.२८/०८/२०२२ रोजी संपणार आहे.तसेच महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ अन्वये गुंठेवारी विकास आध्यापही अस्तित्वात असून तो नियमधिन करणेसाठी अर्ज प्रात होत आहेत.तसेच दि. ३१ डिसेंबर २०२० च्या पुर्व पाडण्यात आलेले हस्तांतरीत झालेला गुंठेवारी विकास नियमाधिन करण्यातसाठी पात्र भुखंड / बांधकाम धाराकडुन अर्ज मागवण्यासाठील व त्यावर कार्यवाही करणेसाठी वेळ लागणार आहे त्याकरिता एक वर्षाची मुद्दत मिळणे आवश्यक आहे.

तरी सदर प्रकरणी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण)सुधारीत अधिनियम २०२१ संपुर्ण लातूर शहर हद्दीतील सदया स्थितीत मंजूर विकास योजना (सु+या.क्षे.) प्रमाणे लातूर शहर मनपा हद्दीतील अनाधिकृत विकास नियमीत करणेसाठी मुदतवाढ देणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेस्तव सादर.

Scanned with OKEN Scanner

निर्णय:- महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियत्रण) सुधारीत अधिनियम २०२१ च्या अधिसुचना प्रसिध्द झाल्यानुसार ३१ डिसेंबर २०२० पुर्वी अस्तीत्वात आलेले / हस्तांतरीत झालेले भुखंड / बांधकामे नियमाधीन करणेसाठी चालु असून त्या करिता मागील तत्कालीन मा.सर्वसाधरण सभा ठराव क्र.२१५ अन्वये दि.२८/०२/२०२२ रोजी फक्त सहा महिन्याची मुदवाढ देण्यात आली होती ती मुदतवाढ संपुष्टात येणार आहे. तरी सध्या स्थितीत अधिनियमतील कलम ४(१) नुसार आज रोजी सुध्दा गुंठेवारीचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत.तसेच मा.जिल्हाधिकारी,लातूर यांनी दि.३१/०९/२०२१ रोजी काढण्यात परिपत्रकानुसार उपअधिक्षक भूमी अभिलेख,लातूर यांचा मोजणी नकाशा मिळणे विलंब होतो असे निदर्शनास येत आहे.

त्या कारणाने लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील दि.३१ डिसेंबर २०२० च्या पुर्वी अस्तीत्वात आलेले हस्तांतरीत, झालेले भुखंड / बांधकामे नियमाधीन करण्यासाठी १ वर्षाची(एक वर्षाची) मुदवाढ देण्यात येते आहे. व तसेच महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम मधील तरतुद नुसार ५(१) नुसार त्या त्या क्षेत्रा मध्ये झालेला गुंठेवारी विकास नियमाधीन करणेस/ नियमाधिन झालेला विकासास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक:-34 दि.1/9/2022

प्रस्ताव:-

विषय:- श्रीमती अश्विनी महाजन देवडे, निलंबीत महापालिका सचिव यांना लातूर शहर महानगरपालिकेच्या सेवेतून कमी केले बाबत.

श्रीमती अश्विनी महाजन देवडे, निलंबीत महापालिका सचिव, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांनी मनपा विशेष सभा जा.क्र./लाशमनपा/नसवि/3274/2022, दि.10/5/2022 या सभेची विषय पत्रिका सर्व संबंधिताना आठ (8) दिवस विलंबाने वितरीत करणे, संबंधितानी आपल्या नियुक्ती पासून ते आजतगायत झालेल्या सभेचे मिनिटस अंतिम न करणे, स्थायी समिती सभापती निवडणूक योग्य पध्दतीने न मांडणे, सभेतील प्रत्यक्ष चर्चा व मिनिटस यामध्ये फरक करणे इत्यादी स्वरुपाचे कार्यालयीन कामकाजात निष्काळजीपणा केलेबाबत त्यांना कार्यालयाचे निलंबन आदेश जा.क्र./लाशमनपाला/सा.प्र.वि./3464/2022, दि.24/5/2022 अन्वये निलंबीत करण्यात आले होते.

सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी कार्यालयीनआदेश दि.24/5/2022अन्वये श्रीमती वीणा पवार, उपायुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

चौकशी अधिकारी यांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन चौकशी अहवाल दि.30/06/2022 रोजी सादर केलेला आहे. सदर चौकशी अहवालात श्रीमती अश्विनी महाजन देवडे, निलंबीत महापालिका सचिव, यांच्यावर 1,2,3,4, व 5 दोषारोप ठेवण्यात आलेले होते.त्यापैकी दोषारोप क्र.1 सिध्द, दोषारोप क्र.3 अंशतः शिध्द, दोषारोप क्र.5 बाबत मान्य करता येत नाही व दोषारोप क्र.2 व 4 सिध्द झालेला नाही. असा निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी दिलेला आहे.

त्यामुळे सदरच्या चौकशीत श्रीमती अश्विनी महाजन देवडे, निलंबीत महापालिका सचिव,लातूर शहर महानगरपालिका, लातूर ह्या दोषी आढळून आल्याने त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 च्या नियम 3 चा भंग केला आहे.

अपचारी कर्मचारी श्रीमती अश्विनी महाजन देवडे, निलंबीत महापालिका सचिव,लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 चे नियम 5 (1) खंड (आठ) व महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (ग) अन्वये सेवेतून कमी करणे योग्य असल्याचे माझे मत झाले आहे.

अपचारी कर्मचारी श्रीमती अश्विनी महाजन देवडे, निलंबीत महापालिका सचिव,लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 चे नियम 5 (1) खंड (आठ) व महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (ग) अन्वये कार्यालयीन आदेश दि.08/08/2022 पासून लातूर शहर महानगरपालिकेच्या सेवेतून कमी करण्यात आल्याबाबतचा प्रस्ताव अवलोकनास्तव सादर केला आहे.

निर्णय:-

कार्यालयीन आदेश दि.08/08/2022 अन्वये श्रीमती अश्विनी महाजन देवडे, निलंबीत महापालिका सचिव,लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 चे नियम 5 (1) खंड (आठ) व महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (ग) अन्वये लातूर शहर महानगरपालिकेच्या सेवेतून कमी करण्यात आले आहे.सदर आदेशास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दिनांकः 7 /9 /2022

प्रशासकीय ठराव क्र. 35 अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे 1) अग्निशमन वाहन BS6- 11,12 टन व चेसिस बॉडी बांधकामसह खरेदी करणे. 2) वॉटर टैंडर टाईप B - IS CODE 950 / 2005 सुधारीत आवृत्ती नुसार BS6-15 टन FIRE TENDER खूलि चेचीस व बॉडीबांधकामसह खरेदी करणे करिता महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानातील जिल्हास्तर अभियान व बळकटीकरण योजने अंतर्गत सन 2021-22, 2022-23 च्या जिल्हा वार्षिक योजनेतून किंवा इतर उपलब्ध निधीतून रक्कम रु. 3.61.कोटी निधी मागणी करणे बाबत.

प्रस्तावः-

लातूर शहर महानगरपालिका लातूर अग्निशमन विभागाकडे एकूण विविध प्रकारचे [वॉटर टैंडर 4,रेस्क्यू टैंडर 1, फोम टैंडर 1, रुग्णवाहिका 1,नविन मल्टीपर्पज fire Tender 1,आसे एकूण 08 वाहने आहेत. त्यापैकी एक फोम टैंडर बंद (पंप काम करत नाही) आहे व वॉटर टैंडर 1 बंद आहे इतर वाहने पूर्ण पणे कार्यन्वित आहेत परंतू ते 12-15 वर्षे जूने झाले आहेत.

सध्या लातूर शहर व परिसरात सततंच लहान-मोठे आगीच्या दुर्घटना घडतात. त्यातल्या त्यात शहराच्या पुर्व बाजुस व जूना गाव भाग आणि मार्केट परिसरात खूप दाट लोकवस्तीसह अरुंद रोड सह मोठ्या प्रमाणात बाजारपेठ आहे.अशा ठिकाणी लहान आग लागली तरिही 1-2 उपलब्ध अग्निशमन वाहने पाठवावी लागतात. रस्ते अरुंद असल्यामुळे मोठे वाहन जाणे शक्य नसल्यामुळे एक छोटी अग्निशमन वाहन घेणे आवश्यक आहे. लातूर शहर महानगरपालिका,लातूर च्या अग्निशमन विभागा करिता आग-आपत्ती प्रसंगी व VIP बंदोबस्त/ कॅनव्हाय मध्ये समाधान कारक कार्य करणे आणि जिवित हानी टाळणे करिता खलिल अत्याधूनिक अग्निशमन वाहने व त्यावरील साहीत्याची आवश्यकता आहे.

अ.क्र.	वाहनाचा तपसिल	नग	अंदाजे अपेक्षित खर्च
1	अत्याधूनिक अग्निशमन वाहन BS6- 11,12 टन व चेसिस बॉडी बांधकाम सह. खरेदी करणे. (कॅनव्हाय व लहान-सहान गल्लीत वापरणेसाठी)	02	1,56,72,000/-
2	वॉटर टैंडर टाईप B-IS CODE 950/2005 सुधारीत आवृत्ती नुसार BS6-15 टन चेसिस व बॉडी बांधकाम सह.	02	2,04,00,000/-
	अंदाजे एकूण	**04**	**3,60,72,000/-**

जिल्हा वार्षिक योजना सन- 2021-22, 2022-23 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हा स्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रु.3.61. कोटी निधी उपलब्ध करून देणे बाबत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत दोन लहान वाहन वाटर टैंडर व दोन मध्यम वॉटर टैंडर टाईप B-IS CODE 950/2005 सुधारीत आवृत्ती नुसार अनुक्रने 1) BS6- 11,12 टन खुली चेसिस व बॉडी बांधकाम सह.2) BS6-15 टन खूलि चेचीस व बॉडीबांधकामसह खरेदी करणे करिताकमी-ज्रास्त प्रमाणात अंदाजे रक्कम रु.3.61 कोटी खर्च अपेक्षित आहे.

तेंव्हा जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2021-22, 2022-23 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी र.रु 3.61 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव आर्थिक व प्रशाकिय मानस्तेस्तव सादर.

निर्णयः- अत्याधुनिक अग्निशमन वाहने खरेदी करिता रु.3.61 कोटी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2021-22, 2022-23 मधून अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करिता लातूर शहर मनपा.अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी र.रु 3.61 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

दिनांकः 7 / 9 /2022

प्रशासकीय ठराव क्र. 36 लातूर शहर महानगरपालिका,लातूर मुख्य इमारतीस व क्षेत्रिय कार्यालय A,B,C,D,इत्यादीस आगप्रतिबंधक उपाययोजना करणे. जसे [हायड्रंट, आलार्म, स्मोक डिअेक्टर्स,Fire Extinguisher, Fire Boll, सर्चलाईट इ.सिस्टीमसह.] महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानातील जिल्हास्तर अभियान व बळकटीकरण योजने अंतर्गत सन 2021 - 22 व 2022-23 च्या जिल्हा वार्षिक योजनेतून किंवा इतर उपलब्ध निधीतून रक्कम रुपये 1.20 कोटी निधी मागणी करणे बाबत..

प्रस्तावः-

लातूर शहर महानगरपालिका लातूर प्रस्तूत इमारत व क्षेत्रिय कार्यालय A,B,C,D, हे महाराष्ट्र आग व जीव संरक्षण कायदा -नियमा प्रमाणे इमारत प्रकार Group "E" BUSINESS BUILDINGS या प्रकारात येत आसल्याने परिशिष्ठ iv मध्ये दिलेल्या निर्देशा प्रमाणे फक्त Fire Extinguisher लावून Fire Safty परिपूर्ण होत नाही परिशिष्ठा प्रमाणे कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे त्याकरिता अदांजित खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

अ.क्र.	वाहनाचा तपसिल	नग	अंदाजे अपेक्षित खर्च
1	लातूर शहर महानगरपालिका,लातूर मुख्य इमारतीस व क्षेत्रिय कार्यालय A,B,C,D,इत्यादीस आगप्रतिबंधक उपाययोजना करणे. जसे [हायड्रंट, आलार्म, स्मोक डिअेक्टर्स, Fire Extinguisher, Fire Boll,सर्चलाईट इ. सिस्टीमसह.]	----	1.20 कोटी
	एकूण		1.20 कोटी

तरि निवेदन कि,लातूर शहर महानगरपालिका,लातूर च्या अग्निशमन विभागा करिता प्रस्तावित प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे लातूर शहर महानगरपालिका,लातूर इमारतिस व क्षेत्रिय कार्यालय A,B,C,D, इत्यादीस आगप्रतिबंधक उपाय-योजना करणेसाठी कमी-जास्त प्रमाणात अंदाजे रक्कम रू.1.20 कोटी खर्च अपेक्षित आहे.

तेंव्हा जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन 2021-22, 2022-23 मधून वरिल प्रमाणेचे उपाय-योजना करणेसाठी रक्कम रुपये 1.20 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव आर्थिक व प्रशाकिय मानस्तेस्तव सादर.

निर्णयः- लातूर शहर महानगरपालिका,लातूर मुख्य इमारतीस व क्षेत्रिय कार्यालय A,B,C,D,इत्यादीस आगप्रतिबंधक उपाय योजना जसे [हायड्रंट, आलार्म, स्मोक डिअेक्टर्स, Fire Extinguisher, Fire Boll,सर्चलाईट इत्यादी सिस्टीमसह.] उपाय-योजना करणेसाठी रक्कम रू.1.20 कोटी अनुदान मागणी प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 37 दिनांकः- 8/9/2022

प्रस्ताव-

लातूर शहर महानगरपालिका हददीमध्ये जेष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्राची निर्मिती करण्यासाठी खोरी गल्ली येथील वेद प्रतिष्ठाणसमोरील जागेस मान्यता देणे बाबत.

श्री. आर बी जोशी, अध्यक्ष, जेष्ठ नागरिक संघ, लातूर यांनी दि. 22/08/2022 रोजी पत्र देवून विनंती केली आहे की, मागील 14 वर्षापासून जेष्ठ नागरिक संघा, तर्फे अनेक पत्राव्दारे विरंगुळा केंद्रा करीता महानगरपालिकेकडे मागणी केलेली आहे. अदयाप पर्यंत प्रकरण निकाली नाही. त्याला प्रतिसाद म्हणून त्यांनी त्यांचे अर्जातील संदर्भ क्रं. 27 नुसार मा. आयुक्त यांचे पत्र त्याशमनपा/नवि/2018-19/1962 दि. 07/03/2019 अन्वये सर्वे नंबर 257 मधील जागेस मंजूरी देण्याबाबत कार्यवाही केली परंतु, सर्वे नंबर 257 मधील जागा वादातील निघाल्यामुळे ताबा घेता आला नाही. महानगरपालिका आयुक्त यांनी जा.क्रं.लामनपा/बांध/256/2020 दि. 09/01/2020 ला दुसरे आदेश काढले त्यानुसार ही त्याची पण अदयाप पुर्ण कार्यवाही केलेली नाही. संदर्भ क्रं. 34 नुसार पत्र आम्ही मनपा यांना पत्र देऊन त्यांना महानगरपालिके मार्फत शहरातील टागोर नगर येथील एक व चार झोन मध्ये प्रत्येकी एक ठिकाण कळवावे व या प्रमाणे देय केलेले विरंगुळा केंद्र स्थापन करणेसाठी मा. सर्वसाधारण बैठक दि. 29/09/2019 ठराव क्रं.107 अन्वये मान्यता मिळाल्याचे कळविले आहे हे विरंगुळा केंद्र स्थापन करणेसाठी मनपाकडून अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन विरंगुळा केंद्राची निर्मिती लवकरात लवकर करावी यासाठी मध्यवर्ती ठिकाणी असलेला खोरी गल्ली मित्र नगर येथील वेद प्रतिष्ठान समोरील ग्रीन बेल्ट ज्येष्ठ नागरिक संघास / विरंगुळा केंद्रास विकसित करण्यासाठी देण्यात यावा अथवा अन्यत्र मध्यवर्ती ठिकाणी असलेला ग्रीन बेल्ट देण्याबाबत विनंती केली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णयः-

श्री. आर बी जोशी, अध्यक्ष, जेष्ठ नागरिक संघ, लातूर यांचेकडुन जेष्ठ नागरीकांसाठी शहरात विरंगुळा केंद्र उभारणी करणेस्तव जागा निश्चीत करुन मिळणेबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. जेष्ठ नागरिक संघ,लातूर यांना मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या खोरी गल्ली मित्र नगर येथील वेद प्रतिष्ठान समोरील ग्रीन बेल्टमधील नगर रचना अधिनियम 1966 अन्वये देय असलेली जागेमध्ये सर्व अटी व शर्तीचे पालन करुन विरंगुळा केंद्र विकसित करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येते. यामध्ये ग्रीन बेल्ट यांची मालकी महानगरपालिकेची राहील आणि यासाठी परवानगी रद्द करण्याचे पूर्ण अधिकार विना अटी महानगरपालिका आयुक्त यांचेकडे ठेवण्यात येत आहेत.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - ३४ दिनांक.१८/०७/ 2022

विषय - लातूर शहर महानगरपालिका परिवहन बससेवमध्ये महिलांना मोफत प्रवास देणे बाबत फेरविचार करून निर्णय घेणे बाबत.

प्रस्ताव -

मा. सर्वसाधारण सभा दिनांक 22/10/2021 तसेच दिनांक 28/02/2022 व 20/05/2022 अन्वये महिलांनी जेवढा प्रवास केला आहे तेवढया प्रवासाचे भाडे रॉयल्टी वजा करून देणे बाबत निर्णय झाला होता. तथापि यावर अधिक खर्च होत असल्याने व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असलेने मा. प्रशासक यांनी यावर फेरविचार करून प्रत्येक बस मध्ये प्रत्येक फेरी मध्ये 35 महिला प्रवासी गृहीत धरून 10 रूपये मोबदला रॉयल्टी कपात न करता देणेचा ठराव दिनांक 31/05/2022 प्रशासकीय ठराव क्र.8 अन्वये पारित केला आहे.परंतु यावर होणार खर्च हा अधिक प्रमाणात होत असलेले व मनपाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

तरी निर्णयास्तव सादर.

निर्णय -

लातूर शहर महानगरपालिका परिवहन बस सेवेमध्ये महिलांना मोफत प्रवास केवळ महानगरपालिका हद्दीत प्रवास करणा-या महिलांना अनुज्ञेय असेल. महानगरपालिका हद्दीबाहेर प्रवास करणा-या महिलांकडुन अभिकर्त्याने तिकीटाची रक्कम वसुल करावी. महानगरपालिका हद्दीबाहेर प्रवास करणा-या महिलांचा तिकीटाचा मोबदला यापुढे अदा करण्यात येणार नाही. सदर आदेशाचा अमल तात्काळ करावा.

Amayura

नगरसचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 39 दिनांक- 12 / 09 / 2022

विषय:- ई-निवीदा क्र. 13/2022-2023 अन्वये मागविण्यांत आलेल्या निवीदावर विचार विनीमय करुन घेणे बाबत.

प्रस्तावना-

उपायुक्त, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान,न.प.प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-३० यांची प्रमा. आदेश क्र. DAYNULM/SUH/SPSC/D10/2022-23/2085 दि.19.05.2022 अन्वये **नागरी बेघरांना नवीन निवारा बांधकाम करणेच्या** कामासाठी अं.प. रु. 1,79,83,270/- (कन्सल्टंन्सी चार्जेस वगळून) ला मान्यता मिळाली आहे. त्यानुषंगाने ई-निवीदा सुचना क्र.13/2022-2023 अन्वये सदर कामाच्या रु. 1,27,88,104/- लक्ष किंमतीच्या कामाची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यानुसार सदर कामांसाठी खालील 03 (तिन) निवीदाधारक सहभागी झाले होते.

1) जावेद कर्टनस्, लातूर

2) इम्रान अहमद जमील अहमद सय्यद, औसा

3) अशफाक मुस्ताक शेख, लातूर

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र.01 (कागदपत्र) दि.26.08.2022 रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करत असताना निवीदा समितीने (1) अशफाक मुस्ताक शेख, लातूर यांचेकडून निवीदा फीस व बयाणा रक्कम भरलेली पावती मागविणे व चालू बीड कॅपॅसिटी मागविणे (2) जावेद कर्टनस्, लातूर यांनी एकच काम केलेचे अनुभव जोडले आहे त्यांचेकडून आणखीन कामे केलेचे अनुभव प्रमाणपत्र मागविणे (3) इम्रान अहमद जमील अहमद सय्यद, औसा यांनी व्यवसाय कर नादेय प्रमाणपत्र मागविणे व बीड कॅपॅसिटी कमी आहे वाढीव बीड कॅपॅसिटी मागविणे असा अभिप्राय दिलेवरुन वरिल तिनही निवीदाकारास कार्यालयीन पत्र क्र. अनुक्रमे 5356, 5355, 5354 दि. 30.08.2022 अन्वये कागदपत्रांची पुर्तता दि.05.09.2022 करावी अन्यथा आपणांस अपात्र करण्यांत येईल असे कळविले होते. त्यानुषंगाने उक्त तिनही निवीदाकार यांनी उल्लेखीत केलेली कागदपत्र विहीत मुदतीत सादर केली आहेत. त्यानुषंगाने निवीदाधारकांचा लिफाफा क्र.02 (देकारपत्रक) दिनांक- 06.09.2022 रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

Scanned with OKEN Scanner

कामाचे नाव:- Proposed Development of Shelter for Urban Homeless-NULM for M.C. Latur. Rs. 1,27,88,104/- Tender ID No.2022_LMC_816785_1

अ.क्र.	निवीदाधारकाचे नांव	निवीदेत दिलेले दर
1.	जावेद कर्टनस्, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% अधिक
2.	इमान अहमद जमील अहमद सय्यद, औसा	अंदाजपत्रक दरापेक्षा 6.00% अधिक
3.	**अशफाक मुस्ताक शेख, लातूर**	**अंदाजपत्रक दर**

सदर कामासाठी न्युनतम (L1) निवीदाधारक अशफाक मुस्ताक शेख, लातूर यांची अंदाजपत्रक दराची निवीदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

तसेच यापुर्वी नागरी बेघरांना नविन निवारा बांधकाम करणेसाठी जागा ही सर्वे क्र.१३९ गांधी मैदान सिंध टॉकीजच्या मागे प्रस्तावित होती. परंतू ती जागा बदलून ठाकरे चौक येथील म.न.पा.शाळा क्र.०४ च्या उत्तरेस महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर करणे सोईचे होईल. ठाकरे चौक शाळा क्र.०४ मध्ये प्राथमिक शाळेचे आरक्षण असुन त्याठिकाणी ३०% जागेमध्ये Accommodation Reservation याचे धोरणाखाली करण्यांस मान्यता व्हावी व बांधकाम विभागाने सदर जागेवर बांधकाम करणेसाठी कार्यादेश देणेची प्रक्रिया करुन काम सुरु करणेच्या पुढील निर्णय घेणेसाठी सादर.

निर्णय :- Proposed Development of Shelter for Urban Homeless-NULM for M.C. Latur या कामासाठी ई-निवीदा क्र.13/2022-2023 अन्वये मागविण्यात आलेल्या निवीदापैकी सर्वात कमी दराची निवीदा अशफाक मुस्ताक शेख, लातूर यांची अंदाजपत्रक दराची निवीदा आहे. निवीदाकार अशफाक मुस्ताक शेख, लातूर यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते.

नागरी बेघरांना नविन निवारा बांधकाम करणेसाठी जागा ही सर्वे क्र.१३९ गांधी मैदान सिंध टॉकीजच्या मागे प्रस्तावित होती. परंतू ती जागा बदलून ठाकरे चौक येथील म.न.पा.शाळा क्र.०४ च्या उत्तरेस महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर बांधकाम करणेस मान्यता देण्यांत येते. तसेच ठाकरे चौक शाळा क्र.०४ मध्ये प्राथमिक शाळेचे आरक्षण असुन त्याठिकाणी ३०% जागेमध्ये Accommodation Reservation याचे धोरणाखाली बांधकाम करण्यांस मान्यता देण्यांत येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांक:-40 दिनांक 20/09 / 2022

विषय:- लातूर शहरातील विविध प्रभागातील दलित वस्तीमध्ये खालील कामांना निधी उपलब्ध करुन देणे बाबत.

संदर्भ:- मा.खा.सुधाकर तुकाराम श्रृंगारे,लोकसभा सदस्य,लातूर यांचे पत्र क्र.६९८/२०२२ दि. ०४.०८.२०२२

प्रस्तावना-

मा.खा.सुधाकर तुकाराम श्रृंगारे,लोकसभा सदस्य,लातूर यांनी संदर्भिय पत्रान्वये लातूर शहरातील खालील प्रभांगामध्ये रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. तरी खालील कामांना निधी उपलब्ध करुन द्यावा असे कळविले आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम लक्ष
१.	प्र.क्र.०३ मध्ये प्रबुध्द नगर येथे विविध ठिकाणी रस्ता करणे.	१५.००
२.	प्र.क्र०३ मध्ये विविध ठिकाणी दलित वस्तीमध्ये नाली करणे.	१५.००
३.	प्र.क्र.०२ मध्ये समाट अशोक नगर पिंटू हॉटेलच्या मागे नाली व रस्ता करणे.	१५.००
४.	प्र.क्र.०२ मध्ये श्रृंगारे ते चांदपाशा शेख व इतर नाथ नगर येथे पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
५.	प्र.क्र.०२ मध्ये साळवे ते हणमंत गायकवाड ते आल्टे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
६.	प्र.क्र.०२ मध्ये चौदंते, नागनाथ जाधव, तांदळे सर ते गवळी नगर नांदेड रोड पर्यंत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
७.	प्र.क्र.०२ मध्ये मळवटी रोड अलफलाह उर्दू स्कुल अंतर्गत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
८.	प्र.क्र.०२ मध्ये ढवळे, सांडगे ते घोडके घर मळवटी रोड येथे अंतर्गत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
९.	प्र.क्र.१२ जिजामाता नगर येथे अजनीकर ते चुनूमियो यांचे घर रस्ता करणे.	१०.००
१०.	प्र.क्र.१२ साठे नगर मध्ये महाराज ते गायकवाड ते शेख यांचे घर रस्ता करणे.	१०.००
११.	प्र.क्र.१३ कपिल नगर मध्ये सिराज शेख ते इंदिरा गांधी शाळा येथे रस्ता करणे.	१०.००
१२.	प्र.क्र.१३ सैनिकपुरी मध्ये राजहंस कांबळे ते कायळे घर रस्ता करणे.	१०.००
१३.	प्र.क्र.०७ मध्ये अडसुळे, सरवदे ते शिरसाठ, कांबळे, इंगळे यांचे घरापर्यंत सिमेंट रोड करणे.	९.६५
१४.	प्र.क्र.०७ मध्ये जाधव ते सव्वद व वैशाली बौध्दविहार समोर सिमेंट रस्ता करणे.	९.९८
१५.	प्र.क्र.०१ येथील पटेल चौक नांदगाव वेस मुख्य रस्त्यावर प्रवेशद्वार करणे.	१०.००
१६.	प्र.क्र.०३ मध्ये इंदिरा नगर येथील शांताबाई क्षिरसागर ते जलसाबाई जगताप यांचे घरासमोरील सिमेंट रोड व नाली करणे.	१५.००
१७.	प्र.क्र.०३ जयभिम नगर येथील विनोद मल्ला ते माधव बनसोडे यांचे घरासमोर सिमेंट रस्ता करणे.	१५.००
१८.	प्र.क्र.११ विक्रम नगर मध्ये कल्याणी यांचे घराजवळील रस्ता व नाली करणे.	१५.००
१९.	प्र.क्र.११ मध्ये तुपे यांचे घराजवळील दोन्ही बाजुने नाली करणे.	१५.००

जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत महानगरपालिकेस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २०२२-२३ साठी वित्तव्यय मंजूर होतो.

सदरची कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून प्रस्तावित करणेसाठी निर्णयस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner

निर्णय:-

उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्रस्तावित १९ कामे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन-२०२२-२०२३ साठी महानगरपालिकेस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत मंजूर नियतव्ययातून खालील प्रमाणे कामे हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार खालील कामांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत निधी मागणी व प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यांत येते.

(रु.लाखात)

अ.क्र.	कामाचे नांव	रक्कम लक्ष
१.	प्र.क्र.०३ मध्ये प्रबुध्द नगर येथे विविध ठिकाणी रस्ता करणे.	१५.००
२.	प्र.क्र०३ मध्ये विविध ठिकाणी दलित वस्तीमध्ये नाली करणे.	१५.००
३.	प्र.क्र.०२ मध्ये सम्राट अशोक नगर पिंटू हॉटेलच्या मागे नाली व रस्ता करणे.	१५.००
४.	प्र.क्र.०२ मध्ये श्रृंगारे ते चांदपाशा शेख व इतर नाथ नगर येथे पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
५.	प्र.क्र.०२ मध्ये साळवे ते हणमंत गायकवाड ते आल्टे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
६.	प्र.क्र.०२ मध्ये चौदंते, नागनाथ जाधव, तांदळे सर ते गवळी नगर नांदेड रोड पर्यंत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
७.	प्र.क्र.०२ मध्ये मळवटी रोड अलफलाह उर्दू स्कुल अंतर्गत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
८.	प्र.क्र.०२ मध्ये ढवळे, लांडगे ते घोडके घर मळवटी रोड येथे अंतर्गत पेव्हर ब्लॉक रोड करणे.	१०.००
९.	प्र.क्र.१२ जिजामाता नगर येथे अजनीकर ते चुनूमियाँ यांचे घर रस्ता करणे.	१०.००
१०.	प्र.क्र.१२ साठे नगर मध्ये महाराज ते गायकवाड ते शेख यांचे घर रस्ता करणे.	१०.००
११.	प्र.क्र.१३ कपिल नगर मध्ये सिराज शेख ते इंदिरा गांधी शाळा येथे रस्ता करणे.	१०.००
१२.	प्र.क्र.१३ सैनिकपुरी मध्ये राजहंस कांबळे ते कावळे घर रस्ता करणे.	१०.००
१३.	प्र.क्र.०७ मध्ये अहसुळे, सरवदे ते शिरसाठ, कांबळे, इंगळे यांचे घरापर्यंत सिमेंट रोड करणे.	९.९५
१४.	प्र.क्र.०७ मध्ये जाधव ते सय्याद व वैशाली बौध्दविहार समोर सिमेंट रस्ता करणे.	९.९८
१५.	प्र.क्र.०१ येथील पटेल चौक नांदगाव वेस मुख्य रस्त्यावर प्रवेशद्वार करणे.	१०.००
१६.	प्र.क्र.०३ मध्ये इंदिरा नगर येथील शांताबाई क्षिरसागर ते जलसाबाई जगताप यांचे घरासमोरील सिमेंट रोड व नाली करणे.	१५.००
१७.	प्र.क्र.०३ जयभिम नगर येथील विनोद मल्ला ते माधव बनसोडे यांचे घरासमोर सिमेंट रस्ता करणे.	१५.००
१८.	प्र.क्र.११ विक्रम नगर मध्ये कल्याणी यांचे घराजवळील रस्ता व नाली करणे.	१५.००
१९.	प्र.क्र.११ मध्ये तुपे यांचे घराजवळील दोन्ही बाजुने नाली करणे.	१५.००

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

67

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्यासाठी उपरोक्त विषयास अनुसरुन प्रशासनाकडून प्राप्त प्रस्तावाचे वाचन करण्यात आले. विभाग प्रमुख सहायक संचालक/ नगर रचनाकार, नगर रचना विभाग लातूर महानगर पालिका यांच्याव्दारे सभागृहात विषयांकीत कामाबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात आली. विषयांकीत काम लातूर महानगर पालिकेच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सभागृत सविस्तर चर्चा करण्यात आली.

ज्याअर्थी लातुर शहर महानगर पालिका हद्दीचा आराखडा टि.पी.एस. ३७००/४७१ /सी.आर.-१५३(अ)/२०००/युडी-३० दि.०२/०१/२००२ रोजी मंजुर करण्यात आलेला असून सन २०२२ मध्ये सदर विकास आराखड्याचा कालावधी संपत आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये शासन निर्देश क्र. टिपीएस१८१०/८३/प्र.क्र.२११५/२०१०/नवि-१३, दि. ०२/०२/२०१२ नुसार ज्या विकास योजना अंमलात येऊन १७ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे त्या सुधारीत करणेची कार्यवाही संबंधित नियोजन प्राधिकरणाने तातडीने सुरु करणे आवश्यक असल्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने दि. २५/१/२०१९ रोजी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत तसेच राज्यातील सर्वच नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रासाठी विकास योजना भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Information System-GIS) वापरुन द्रृतगती पध्दतीने तयार करण्यासाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील प्रपत्रकानुसार भौगोलिक माहिती प्रणालीचे (GIS) स्तर (Layers) उप स्तर (Sub Layers) व प्रपत्र-क प्रमाणे माहितीचा तपशिल (Data Structure) तयार करुन विद्यमान जमीन वापर नकाशे व प्रारुप विकास योजनेचे नकाशे तयार करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी लातूर महानगर पालिकेचा विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही नगर रचना अधिनियम १९६६ चे उपबंधानुसार पुर्ण करणे आवश्यक असून सदर काम महानगरपालिकेच्या नियोजन व विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

ज्याअर्थी लातूर महानगर पालिकेव्दारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ (२) सह कलम २३ (१ व २), ३८ अन्वये महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्याबाबत ठराव पारित करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी लातूर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करण्यासाठी शासनाच्या नगर रचना विभागाव्दारे नगर रचनाकार, विशेष घटक कार्यालयाची नेमणूक करण्यात आलेली असून विकास योजनेची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे उपबंधानुसार करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी विकास योजना तयार करण्याची कार्यवाही सहायक संचालक, नगर रचना विभाग, या श्रेणीच्या अधिकारी अंर्तगत करण्याबाबत शासन निदेश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त बाबींचा विचार करता पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

लातूर महानगर पालिकेचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी विकास योजना सुधारीत करण्याचे कामे अत्यंत गरजेचे असल्याने लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्यासाठी

Scanned with OKEN Scanner

मा. सहायक संचालक, नगर रचना विभाग, जिल्हा लातूर यांची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगर रचना अधिकारी नियुक्ती करण्यात यावी व त्यासाठी लागणारा खर्च महानगरपालिकेच्या बांधकाम विकास शुल्क लेखाशिर्षातून करण्यास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान करीत आहे.

नगरसचिव
लातूर महानगरपालिका, लातूर

(प्रशासक)
लातूर शहर महानगर पालिका

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

सभा क्रमांक :
विषय क्र. – 57

प्रशासकीय ठराव क्र. : 57

दि.23/11/2022

विषय:- लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारित करणे.
(लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ (२) सह कलम २३ (१ व २), ३८ अन्वये राजपत्रात इरादा घोषीत करणे)

लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्यासाठी उपरोक्त विषयास अनुसरुन प्रशासनाकडून प्राप्त प्रस्तावाचे वाचन करण्यात आले. विभाग प्रमुख नगर रचनाकार, विशेष घटक, विकास योजना लातूर महानगर पालिका यांच्याव्दारे सभागृहात विषयांकीत कामाबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला. विषयांकीत काम लातूर महानगर पालिकेच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सभागृत सविस्तर चर्चा करण्यात आली.

ज्याअर्थी लातुर शहर महानगर पालिका हद्दीचा आराखडा टि.पी.एस. ३७००/४७१ /सी.आर.-१५३(अ)/२०००/युडी-३० दि.०२/०१/२००२ रोजी मंजुर करण्यात आलेला असून सन २०२२ मध्ये सदर विकास आराखड्याचा कालावधी संपणार आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये शासन निर्देश क्र. टिपीएस१८१०/८३/प्र.क्र.२११५/२०१०/नवि-१३, दि. ०२/०२/२०१२ नुसार ज्या विकास योजना अंमलात येऊन १७ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे त्या सुधारीत करणेची कार्यवाही संबंधित नियोजन प्राधिकरणाने तातडीने सुरु करणे आवश्यक असल्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने दि. २५/१/२०१९ रोजी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत तसेच राज्यातील सर्वच नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रासाठी विकास योजना भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Information System-GIS) वापरुन द्रुतगती पध्दतीने तयार करण्यासाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील प्रपत्रकानुसार कामे पुर्ण करणे बंधनकारक केलेले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

लातूर महानगर पालिकेचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी विकास योजना सुधारीत करण्याचे कामे अत्यंत गरजेचे असल्याने लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्याबावत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ (२) सह कलम २३ (१ व २), ३८ अन्वये इरादा राजपत्रात घोषीत करुन वर्तमान पत्रात जाहिर सुचना देण्यात यावी व त्यासाठी लागणारा खर्च महानगरपालिकेच्या बांधकाम विकास शुल्क लेखाशिर्षातून करण्यास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान करीत आहे.

नगरसचिव
लातूर महानगरपालिका, लातूर

( )
प्रशासक
लातूर शहर महानगर पालिका

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

सभा क्रमांक : प्रशासकीय ठराव क्र. : 58 दि.23/ 11 /२०२२

विषय क्र. – 58

विषय:- लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारित करणे.
(लातूर महानगर पालिका हद्दीचा शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दिनांक २५/१/२०१९ रोजीच्या दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील निर्देशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे तसेच नगर रचनाकार, विशेष घटक कार्यालयास विकास योजना तयार करण्यासाठी सहकार्य करण्यासाठी ई-निविदा मागवून खाजगी कंत्राटदाराची नियुक्ती करणे)

लातूर महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्यासाठी उपरोक्त विषयास अनुसरुन प्रशासनाकडून प्राप्त प्रस्तावाचे वाचन करण्यात आले. विभाग प्रमुख सहायक संचालक/ नगर रचनाकार, नगर रचना विभाग लातूर महानगर पालिका यांच्याव्दारे सभागृहात विषयांकीत कामाबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात आली. विषयांकीत काम लातूर महानगर पालिकेच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सभागृत सविस्तर चर्चा करण्यात आली.

ज्याअर्थी लातुर शहर महानगर पालिका हद्दीचा आराखडा टि.पी.एस. ३७००/४७१ /सी.आर.-१५३(अ)/२०००/युडी-३० दि.०२/०१/२००२ रोजी मंजुर करण्यात आलेला असून सन २०२२ मध्ये सदर विकास आराखड्याचा कालावधी संपणार आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये शासन निर्देश क्र. टिपीएस१८१०/८३/प्र.क्र.२११५/२०१०/नवि-१३, दि. ०२/०२/२०१२ नुसार ज्या विकःस योजना अंमलात येऊन १७ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे त्या सुधारीत करणेची कार्यवाही संबंधित नियोजन प्राधिकरणाने तातडीने सुरु करणे आवश्यक असल्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

ज्याअर्थी लातूर महानगर पालिकेव्दारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ (२) सह कलम २३ (१ व २), ३८ अन्वये महानगर पालिका हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करण्याबाबत ठराव पारित करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३, दि. २५/१/२०१९ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत तसेच राज्यातील सर्वच नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रासाठी विकास योजना भौगोलिक माहिती प्रणाली (Geographical Information System-GIS) वापरुन द्रुतगती पध्दतीने तयार करण्यासाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील प्रपत्रकानुसार भौगोलिक माहिती प्रणालीचे (GIS) स्तर (Layers) उप स्तर (Sub Layers) व प्रपत्र-क प्रमाणे माहितीचा तपशिल (Data Structure) तयार करुन विद्यमान जमीन वापर नकाशे व प्रारुप विकास योजनेचे नकाशे तयार करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी शासनाने दिनांक २५/०१/२०१९ व दिनांक १७/०६/२०१९ नुसारच्या शासन निर्णयाप्रमाणे अंमंलबजावणी करण्यासाठी मा. संचालक, नगर रचना विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याव्दारे खाजगी संस्थांच्या निवडसुची प्रस्तावासाठीचे विनंती पत्र (Request for Proposal-RFP) प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थीशासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दिनांक २५/१/२०१९ व दिनांक दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील सुचनेप्रमाणे विकास योजनेची कामे पुर्ण करण्यासाठी महानगरपालिकेकडे तसेच विकास योजना, विशेष घटक कार्यालयाकडे यंत्रणा उपलब्ध नाही.

Scanned with OKEN Scanner

ज्याअर्थी शासनाने सर्व महानगर पालिका क्षेत्राच्या विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३, दि. २५/१/२०१९ नुसार व दि.१७/०६/२०१९ च्या शुध्दिपत्रकानुसार तयार करण्याबाबत जा.क्र.टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३, दि. ३१/१२/२०२० अन्वये मा. संचालक, नगर रचना विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी खाजगी संस्थांची निवडसुची तयार करण्यासाठी मागविलेल्या निवडसुचीच्या प्रस्तावासाठीचे विनंती पत्राप्रमाणे (Request for Proposal-RFP) ई-निविदा प्रसिध्द करुन खाजगी कंत्राटदार नियुक्त करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी लातूर महानगर पालिकेचा विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही नगर रचना अधिनियम १९६६ चे उपबंधानुसार पुर्ण करणे आवश्यक असून सदर काम महानगरपालिकेच्या नियोजन व विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

लातूर महानगर पालिका हद्दीचा शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३ दिनांक २५/१/२०१९ रोजीच्या दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील निर्देशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करणे तसेच नगर रचनाकार, विशेष घटक कार्यालयास विकास योजना तयार करण्यासाठी सहकार्य करण्यासाठी ई-निविदा मागवून खाजगी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात यावी व त्यासाठी लागणारा खर्च महानगरपालिकेच्या बांधकाम विकास शुल्क लेखाशिर्षातून करण्यास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान करीत आहे.

नगररचनेव
लातूर महानगरपालिका, लातूर

( )

प्रशासक
लातूर शहर महानगर पालिका

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासकीय ठराव

ठराव क्र :- 559 दि. 30/11/2022

संदर्भ :- १) दि. 21/01/2022 रोजी झालेला करारनामा लातूर शहर महानगरपालिका व श्री गुरुगणेश जीवराज जैन गोरक्षण संस्था, लातूर

२) दिनांक 11/11/2022 रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक

३) श्री गुरुगणेश जीवराज जैन गोरक्षण संस्था, लातूर यांचे दि.28/09/2022 रोजी चे पत्र

४)विभाग प्रमुख कोंडवाडा विभाग यांचा प्रस्ताव दिनांक /11/2022

प्रशासकीय मंजुरीचे आदेश

ज्याअर्थी संदर्भ क्र. १,२,३ च्या प्रस्तावानुसार प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना आहे.

व ज्याअर्थी संदर्भ क्र ४ अन्वये विभाग प्रमुख कोंडवाडा विभाग लातूर शहर महानगरपालिका लातूर यांनी उक्त प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. विभाग प्रमुख कोंडवाडा विभाग लातूर शहर महानगरपालिका लातूर यांनी प्रस्तावीत केलेल्या करारनाम्यातील अटीत सुधारणा केल्याप्रमाण

करारनाम्यानुसार जी मोकाट जनावरे पकडुन गोरक्षणात दाखल करण्यात आलेली आहेत. मालक असलेल्या जनावराच्या मालकाकडुन प्रती जनावर प्रति दिवस 500/- रुपये सात (07) दिवसाचे 3500/- रुपये व 1000/- रुपये लातूर शहर महानगरपालिका लातूर येथे दंड म्हणुन भरण्यात येतो.

ज्या मोकाट जनावरास मालक नाही अशा जनावराचे प्रति जनावर प्रति दिवस 500/- रुपये सात (07) दिवसाचे 3500/- रुपये श्री गुरुगणेश जीवराज जैन गोरक्षण संस्था, लातूर यांना अदा करणेस मान्यता खालील प्रमाणे देण्यात येते.

अनु क्र.	कामाचे स्वरूप	रक्कम	एकूण जनावर	एकूण रक्कम
1)	मालक नसलेल्या मोकाट जनावरांना दयावयाचे संगोपन खर्च	500/- सात दिवस	26	91000/-

अक्षरी (एक्यानऊ हजार रु .फक्त)

तसेच विभाग प्रमुख कोडवाडा विभाग लातूर शहर महानगरपालिका लातूर यांनी प्रस्तावित केल्या प्रमाणे येथुन पुढे मालक नसलेल्या मोकाट जनावराचे उपरोक्त प्रमाणे रक्कम संबधीत गोशाळेस अदा करणे बाबत मान्य करण्यात आले.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रतिलिपी :-

1)मुख्यलेखाधिकारी,लातूर शहर महानगरपालिका लातूर यांना अनुपालनार्थ देण्यात येते.

2) मुख्यलेखापरिक्षक,लातूर शहर महानगरपालिका लातूर यांना अनुपालनार्थ देण्यात येते.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांकः 60 दिनांक : 7 /12/2022

विषयः शहरातील विविध विकास कामे प्रस्तावित करणेबाबत.

संदर्भः मा. शैलेश लाहोटी, मा. अध्यक्ष, भा.ज.पा.लातूर यांचे पत्र दि.6.12.2022

प्रस्तावनाः लातूर शहरातील नागरिकांनी तसेच नागरी संघटनांनी निवेदनाद्वारे व संदर्भीय पत्राद्वारे मा. शैलेश लाहोटी, मा. अध्यक्ष, भा.ज.पा. लातूर यांनी दि. 6.12.2022 रोजीच्या पत्राद्वारे शहरातील विविधं भागातील विकास कामे करण्याची मागणी केली आहे ती खालील प्रमाणे आहेः

अ.क्र.	कामाचे स्वरुप	अंदाजित रक्कम रु. (लाखात)
1	प्र. क्र. 16 कन्हेरी रोड ते पाणी टाकी पेवर रोड करणे	10 लाख
2	प्र. क्र. 16 पाणी टाकी ते भालेराव यांचे घर पेवर ब्लॉक रस्ता करणे	10 लाख
3	प्र. क्र. 16 कॉईल नगर गव्हाणे हॉस्पिटल ते जवाहरलाल नेहरु शाळा पेवर ब्लॉक रस्ता करणे	10 लाख
4	प्र. क्र. 16 जवाहरलाल नेहरु शाळा कॉईल नगर ते पाटील यांचे घर पेवर ब्लॉक रोड करणे	10 लाख
5	प्र. क्र. 16 पार्टील यांचे घर ते एसएससी बोर्ड ते मोठा नाला पर्यंत पेवर ब्लॉक रोड करणे	10 लाख
6	प्रभाग क्र. 8 भोई गल्ली येथील वीरशैव ककय्या समाज मंदीर उर्वरीत काम विकसित करणे	20 लाख
7	प्र. क्र. 6 अंबिका फर्टीलायझर्स ते राजू यूनिफॉर्म व इतर ठिकाणी पेवर रस्ता करणे	10 लाख
8	प्र. क्र. 6 कजरी लेडीज वेअर समोर नाली करणे	5 लाख
9	प्र. क्र. 6 रेणुका इडली सेंटर ते म्हैसेकर कॉम्पलेक्स पेवर रस्ता करणे	10 लाख
10	मारवाडी स्मशान भूमी गेट समोर पेवर रस्ता करणे	10 लाख

Scanned with OKEN Scanner

11	प्र. क्र. 6 तिगीले ते सोहेल मंजील व इतर ठिकाणी नाली करणे	10 लाख
12	प्र. क्र. 6 डॉ. थोन्टे ते रॉयल टेलर नाली करणे	10 लाख
13	प्र. क्र. 6 हॉटेल नर्तिकी व इतर ठिकाणी नाली व रस्ता करणे	10 लाख
14	प्र. क्र. 6 हनुमान चौक ते गंजगोलाई हेरीटेज पोल बसवणे	10 लाख
15	प्र. क्र. 6 छत्रपती शाहू महाराज चौक ते साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक हेरीटेज लाईट बसवणे	10 लाख
16	प्र. क्र. 12 पंचवटी नगर मोहोळकर यांच्या घरासमोर पेवर रस्ता करणे	10 लाख
17	प्र. क्र. 12 आमलेश्वर नगर महेश कुलकर्णी यांच्या घरासमोर नाली करणे	10 लाख
18	प्र. क्र. 8 राजगोपाल राठी ते गोविंदकुमार लाहोटी व इतर ठिकाणी नाली करणे	10 लाख
19	प्र. क्र. 8 कस्तुरी नगर सुरज मुंदडा ते शहदातपुरी व इतर ठिकाणी सिमेंट रस्ते करणे	10 लाख
20	प्र. क्र. 8 फुलझळके यांच्या घरासमोर ते केतन हलवाई यांच्या घरापर्यत पेवर रस्ता करणे	10 लाख
21	प्र. क्र. 8 फुलझळके यांच्या घरापासून ते प्रकाश कॅपच्या मागच्या बाजूस नाली करणे	5 लाख
22	प्र. क्र. 12 पांचाळ ते जाधवर येथे रोड व नाली करणे	10 लाख
23	प्र. क्र. 9 अन्सार रेसीडेन्सी इंडिया नगर हरुण सय्यद ते नसरोद्दीन फुलारी नाली करणे	10 लाख
24	प्र. क्र. 9 अन्सार रेसीडेन्सी इंडिया नगर हरुण सय्यद ते नसरोद्दीन फुलारी रस्ता करणे	10 लाख
25	प्र. क्र. 6 संतोष ट्रेडर्स ते ढगे किराणा पेवर रस्ता करणे	10 लाख
26	प्र. क्र. 6 रेड्डी किराणा ते शंकर फुलारी पेवर रस्ता करणे	10 लाख
27	प्र. क्र. 16 दिपक मंत्री ते श्रीनिवास नगर ग्रीन बेल्ट पर्यंत सिमेंट रस्ते करणे	10 लाख
28	प्र. क्र. 8 लाहोटी कंपाऊंड कैलास मंत्री यांच्या घरासमोर सिमेंट रस्ता करणे	5 लाख
29	प्र. क्र. 16 संजय मंत्री ते लोहीया यांचे घर सिमेंट रस्ता करणे	6 लाख
30	प्र. क्र. 18 पोस्ट कॉलनी आरदवाड ते बेंबडे यांच्या घरासमोर आरसीसी रोड करणे	10 लाख

Scanned with OKEN Scanner

31	प्र. क्र. 17 अलका शिंदे यांचे घर ते तोडकर यांचे घरापर्यत सी.सी. रोड करणे	10 लाख
32	प्र. क्र. 17 वाघमारे यांचे घर ते कुलकर्णी यांच्या घरापर्यत नाली करणे	10 लाख
33	प्र. क्र. 17 शनि मंदीर ते देसाई नगर पर्यत सी.सी. नाली करणे	10 लाख
34	प्र. क्र. 17 देसाई नगर ते जोशी यांच्या घरापर्यत सी.सी. रोड करणे	10 लाख
35	प्र. क्र. 17 आनंद कोरे ते अंकुर शाळा पर्यत सी.सी. रोड करणे	10 लाख
36	प्र. क्र. 2 मळवर्टी रोड थवळे वलाकटे ते गवरे लांडगे सर, पडीले स्कुल पर्यत पेवर ब्लॉक रोड करणे	10 लाख
37	लाहोटी कंपाऊंड मंदीर ते द्वारका नगरी कॉर्नर पर्यंत सिमेंट रोड करणे	10 लाख
38	लाहोटी कंपाऊंड मंदीर ते द्वारका नगरी कॉर्नर पर्यंत नाली करणे	10 लाख
39	कस्तुरी नगर मध्ये राठी ते लोया घरापर्यत सिमेंट रोड करणे	10 लाख
40	कस्तुरी नगर मध्ये राठी ते लोया घरापर्यत नाली करणे	10 लाख
41	कस्तुरी नगर मध्ये अतुल ठक्करच्या घरासमोर नाली करणे	10 लाख
42	कस्तुरी नगर मध्ये रस्ता करणे	10 लाख
43	कस्तुरी नगर मध्ये नाली करणे	10 लाख
44	कस्तुरी नगर बंग ते मुंदडा नाली करणे	10 लाख
45	कस्तुरी नगर मध्ये कटारिया निवास समोर व इतर ठिकाणी पेव्हर रस्ता करणे	10 लाख
46	कस्तुरी नगर भारतभूषण जनरल ते भुतडा घरासमोर सिमेंट रस्ता करणे	10 लाख
47	कस्तुरी नगर भारतभूषण जनरल ते भुतडा घरासमोर नाली करणे	10 लाख
48	लाहोटी कंपाऊंड ते ढवळे ते हनुमान मंदीर रस्ता करणे	10 लाख
49	लाहोटी कंपाऊंडमध्ये कन्यका ते सिंग झेरॉक्स पर्यत सिमेंट रस्ता करणे	10 लाख
50	प्रभाग क्र. 8 येथील औसा हनुमान परिसरातील रस्ते करणे	10 लाख
51	प्रभाग क्र. 8 येथील जुनी सराफ लाईन येथील रस्ते करणे	10 लाख
52	प्रभाग क्र. 8 येथील आझाद चौक परिसरातील रस्ते करणे	10 लाख
53	प्रभाग क्र. 8 येथील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे	10 लाख

Scanned with OKEN Scanner

54	प्रभाग क्र. 8 येथील नावंदर गल्ली परिसरातील रस्ते करणे	10 लाख
55	सिध्देश्वर मंदीर जवळील वीरशैव लिंगायत स्मशान भूमी विकसित करणे	50 लाख
56	प्रभाग क्र. 8 उजनीवाले गल्ली येथे रस्ता करणे	10 लाख
57	प्रभाग क्र. 8 येथील रस्ते पॅचवर्क करणे	10 लाख
58	प्र. क्र. 17 पवन गायकवाड यांच्या घर ते राजकुमार गायकवाड यांच्या घरापर्यत नाली करणे (यमुना सोसायटी जवळ)	10 लाख
59	प्र. क्र. 12 कुलस्वामिनी नगर महेश कुलकर्णी यांच्या घरासमोर नाली करणे	10 लाख
60	प्र. क्र. 15 नारायण नगर मोरे पाटील ते आर.एस. पाटील नाली करणे	10 लाख
61	प्र. क्र. 15 बलदवा स्मशान भूमी ते लाकडी अडडा व इतर ठिकाणी नाली करणे	10 लाख
62	प्र. क्र. 15 आंबेकर ते महादेव मंदीर नारायण नगर नाली करणे	10 लाख
63	प्र. क्र. 15 हाके नगर कॉर्नर ते बिराजदार ते यु. डी. स्वामी नाली करणे	10 लाख
64	प्र. क्र. 7 अलका हाईट ते शहा अपार्टमेंट व नवजीवन अपार्टमेंट ते लक्ष्मी आंगण पेवर रस्ता करणे	10 लाख
65	प्र. क्र. 11 श्रीनगर बिलापट्टे ते सुर्यवंशी सिमेंट रस्ता करणे	30 लाख
66	प्र. क्र. 11 एम.आय.डी.सी. रोड, राचट्टे कॉम्पलेक्स जवळ सिमेंट रस्ते करणे	10 लाख
67	कन्हेरी येथे 80 फुट रोडवरील पुल बांधकाम करणे	50 लाख
68	प्र. क्र. 12 सौदागर डि. पी. ते बेंबडे घर नाली व रस्ता करणे	10 लाख
69	प्र. क्र. 16 भुतडा यांचे घर ते ग्रीन बेल्ट पर्यत सिमेंट रस्ता करणे	5 लाख
70	प्र. क्र. 16 मंत्री नगर येथील विविध ठिकाणी नाली करणे	10 लाख
71	प्र. क्र. 18 तिरुमला कॉलनी पिनाटे नगर येथे जानवी अपार्टमेंट ते दुडीले यांच्या घरापर्यत नाली करणे	10 लाख
72	प्र. क्र. 18 तिरुमला कॉलनी पिनाटे नगर येथे दुडीले यांचे घरापासून कुडगे यांच्या घरापर्यत आरसीसी रोड करणे	10 लाख
73	प्र. क्र. 18 पोस्ट कॉलनी ते बेंबडे साहेब ते आरदवाड यांच्या घरासमोर नाली करणे	10 लाख
74	प्र. क्र. 17 सुवर्णकार यांचे घर ते स्वामी यांच्या घरापर्यत सी.सी. रोड करणे	10 लाख

Scanned with OKEN Scanner

75	प्र. क्र. 17 सलगरे यांचे घर ते कोचेटा यांचे घरापर्यत सी.सी. रोड करणे	10 लाख
76	प्र. क्र. 17 डॅनिअल यांचे घर ते जोशी यांच्या घरापर्यत सी.सी. रोड करणे	10 लाख
77	प्र. क्र. 17 देशपांडे ते आवाळे यांच्या घरापर्यत सी. सी. रोड करणे	10 लाख
78	प्र. क्र. 2 मळवटी रोड पडीले स्कुल लांडगे मरे ते वलाकटे घरापर्यत नाली बांधणे	10 लाख
79	सुर्यवंशी ते बोरा ते राजेश मंत्री ते गिल्डा निवास, ॲड. रायकुडे ते अग्रवाल हॉटमिक्स रस्ता करणे	30 लाख
80	लाहोटी कंपाऊंड ते ढवळे ते हनुमान मंदीर नाली करणे	10 लाख
81	लाहोटी कंपाऊंड इंद्रायणी ते भारतभूषण सिमेंट रोड करणे	10 लाख
82	लाहोटी कंपाऊड मध्ये व्यंकटेश एजन्सीज समोर सिमेंट रस्ता करणे	10 लाख
83	प्रभाग क्र. 8 येथील अंबिका मंदीर परिसरात रस्ते करणे	50 लाख

जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत महानगरपालिकासाठी नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना (जिल्हास्तर), लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन 2022-23 साठी नियतव्यय होतो.

सन 2022-23 साठी यापूर्वी पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी प्राप्त करुन घेऊन निधी उपलब्धतेसाठी शहर अभियंता यांनी पाठपुरावा करावा. तसेच उर्वरीत तरतुदीतून व Reappropriation मधून जास्तीत जास्त प्रस्ताव मंजूर करुन घेण्याच्या दृष्टीने शहर अभियंता यांनी सदर प्रस्तावित यादीसह पाठपुरावा करावा.

Scanned with OKEN Scanner

निर्णय :-

प्रस्तावित अ. क्र. 1 ते 83 कामांची जिल्हा नियोजन समिती मार्फत 2022-23 करीता प्राप्त होणारे अनुज्ञेय निधीतून प्रस्तावित करण्यासाठी निश्चित करण्यात येऊन अ. क्र. 01 ते 06 कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौध्द वस्ती सुधार योजनेतून, अ.क्र. 07 ते 83 कामे नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेतून किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) योजनेतून अनुज्ञेय निधीतून तांत्रिक मान्यतेसह परिपूर्ण प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हा स्तर) योजनेअंतर्गत प्राप्त होणारा निधीचा 30 % म.न.पा. हिस्सा 15वा वित्त आयोग अथवा इतर अनुज्ञेय निधीतून किंवा म.न.पा. फंडातून देण्यास मान्यता देण्यात आली.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 61 दिनांक 9 /12/ 2022

विषय - Appointment of agency for design of Latur City Drainage System.

संदर्भ - 1.Tender Notice No. 09 दिनांक 26.08.2022
2. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र जा.क्रं./मजीप्रा/सस/तांशा-4/479 दि. 08 एप्रिल 2021
3. शासन परिपत्रक क्रं. अमृत 2022 / प्र: क्रं. 203 / नवि – 33 दि. 16 सप्टेंबर 2022

प्रस्ताव -

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियांन अंतर्गत लातूर शहराकरिता भुयारी गटार योजनेचा प्रस्ताव मंजुर झालेला असुन सदर अभियांना करिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे आवश्यक आहे. त्याकरिता संदर्भ क्रं. 1 अन्वये काढण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया राबविले असता ती शासन निर्णयाप्रमाणे झाली नसल्या कारणाने रद्द करण्यात आली. अमृत 2.0 अभियांन अंतर्गत भुयारी गटार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनाल , पाठविणेकरिता शासन स्तरावरुन पाठपुरावा चालु आहे. सदर कामाचा प्रस्ताव तातडीने न पाठविल्यास लातूर शहर महानगरपालिकेसाठी मंजुर अमृत 2.0 आराखडयातुन नाव वगळले जाऊ शकते. तसेच हि योजना Time Bound असल्या कारणाने तातडीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणे जरुरीचे आहे. संदर्भ क्रं. 2 नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत अंमलबजावणी करण्यांत येणा-या ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा व मलनिःस्सारण कामाच्या प्रकल्प व्यवस्थापनासाठी मजीप्रा मार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची (PMC) एकुण 16 संस्थाची नामिका (empanelment) तयार करण्यांत आली आहे. संदर्भ क्रं. 3 च्या शासन परिपत्रक नुसार अमृत 2.0 अभियानांतर्गत मंजुर झालेल्या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नेमण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना खालील 3 पर्यायापैकी एक पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली आहे.

ई) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रकल्प व्यस्थापन सल्लागार म्हणुन नेमता येईल.
उ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लगारांच्या एकुण 16 संस्थापैकी कोणत्याही एका संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन निवड करणे.
ऊ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मजीप्राने विहीत केलेल्या मॉडेल RFP नुसार निविदा प्रक्रिया करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) नेमणुक करण्याची मुभा राहील.

संदर्भ क्रं. 1 अन्वये जी ई-निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यात PMC शुल्काकरिता 2.40% दर प्राप्त झाले होते. जे कि शासन परिपत्रकानुसार मंजुर असलेल्या 3.2 % दरापेक्षा कमीचे दर आहेत. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराकरिता मजीप्रा ने विहीत केलेल्या दरापेक्षा कमी दराने काम करण्यास एखादी संस्था तयार असल्यास त्यांची निवड करण्याची नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मुभा देण्यात आली आहे. लातूर शहर महानरगपालिकेकरिता केंद्र पुरस्कृत अमत 2.0 योजनेसाठी PMC प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे काम मिळणेकरिता मजीप्राने empanelment केलेल्या संस्थेतुन खालीलप्रमाणे संस्थांनी अर्ज केले असुन त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अनु क्रं.	एजन्सीचे नांव	PMC शुल्क
1.	मे. बी.एल.जी. कन्स्ट्रक्शन सर्विसेस प्रा. लि., जोधपूर / मे. मानवसेवा कन्सल्टन्ट धुळे (JV)	2.36 %
2.	मे. पुराणिक ब्रदर्स, नागपूर	3.05%
3.	मे. जीओस्पेक्टल स्टुडीओ, एल.एल.पी., पुणे / मे. प्लॅनिंग सोल्युशन वडोदरा (Collaboration)	3.10%

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त तक्त्याप्रमाणे सर्वात कमीचे दर म्हणजे 2.36 % हे मे. बी.एल.जी. कन्स्ट्रक्शन सर्विसेस प्रा. लि., जोधपूर / मे. मानवसेवा कन्सल्टन्ट धुळे (JV) यांचे असुन आपणांस ई-निविदाद्वारे प्राप्त झालेल्या रक्कमेपेक्षा कमीचे आहे. शासन परिपत्रकामधील मुद्दा क्रं. 3 (अ) अन्वये कोणत्याही एका संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन निवड करणेची मुभा देण्यात आली आहे. त्याप्रमाणे प्राप्त झालेले सर्वात कमीचे दर म्हणजे 2.36% PMC शुल्कास मंजुरी मिळाली आहे.

तरी प्राप्त झालेल्या अर्जापैकी सर्वात कमी दर हे मे. बी एल जी. कन्स्ट्रक्शन सर्विसेस प्रा. लि., जोधपूर / मे. मानवसेवा कन्सल्टन्ट धुळे (JV) यांचे आहे.

निर्णय :-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियान अंतर्गत लातूर शहराकरिता भुयारी गटार योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) बनविणेकरिता सर्वात कमीचे दर म्हणजे 2.36 % मे. बी.एल.जी. कन्स्ट्रक्शन सर्विसेस प्रा. लि., जोधपूर / मे. मानवसेवा कन्सल्टन्ट धुळे (JV) यांचे दरास अर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 62 दिनांकः- 13/12/2022

प्रस्ताव-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत लातूर शहरातील रस्ते विकासाचे विविध प्रकल्प योजना कामे पूर्ण करणेसाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत(MUDICL) मुन्क्रामार्फत कर्ज व अनुदान स्वरुपात निधी उपलब्ध करुन मिळणेबाबत प्रस्ताव पाठविण्यासाठी मान्यता मिळणेबाबत

सादरः- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत लातूर शहर महागनरपालिकेचा रस्ते विकास प्रकल्पास प्रशासकीय मान्यता शासन आदेशानुसार मंजूर झाला आहे, तसेच मा.जिल्हाधिकारी, लातूर यांचे प्रशासकीय मान्यतेनुसार शहरातील लोकनेते विलासराव देशमुख मार्ग विकसित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.त्यानुसार सर्व कामांचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत व सर्व कामे प्रगतीपथावर आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाकडुन व जिल्हा नियोजन समितीमार्फत खालीलप्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे तसेच महानगरपालिकेमार्फत म.न.पा.हिस्सा उभारणे आवश्यक आहे सदरची कामे पूर्ण करणेसाठी खालीलप्रमाणे निधीची आवश्यकता आहे.

अ. क्र.	योजनेचे नाव	मंजुर किंमत	शासन/जि.नि.स. अनुदान	प्राप्त अनुदान	मनपा हिस्सा	मंजुर निविदेनुसार अधिकची रक्कम	मनपा मार्फत एकूण उभारावयाचा निधी
१	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान(राज्य स्तर)	६८.१८ कोटी	४७.७२६ कोटी	१४.०० कोटी	२०.४५४ कोटी	६.०२९ कोटी	२६.४८३ कोटी
२	महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) लोकनेते विलासराव देशमुख मार्ग विकसित करणे.	१४.४६ कोटी	१०.१२ कोटी	१०.१२ कोटी	४.३४ कोटी	०	४.३४ कोटी
	एकुण(रु.कोटीमध्ये)	८२.६४०	५७.८४६	२४.१२०	२४.७९४	६.०२९	३०.८२३

तरी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राज्यस्तर व जिल्हास्तर योजनेचे सर्व कामे पूर्ण करण्यासाठी रु.३०.८२३ कोटी निधीची आवश्यकता आहे. सदरील आवश्यक निधी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत (MUDICL) MUINFRA मार्फत कर्ज व अनुदान स्वरुपात उभारणेसाठी म.न.पा.सर्वसाधारण सभा

Scanned with OKEN Scanner

दि.१२.१०.२०२१ ठराव क्र. २१० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील निधी लातूर शहर महानगरपालिकेस महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादित(MUDICL) MUINFRA योजनेअंतर्गत कर्ज व अनुदान स्वरुपात मंजूर करण्यात येणेबाबत तसेच सदरील कर्जाची परतफेड महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या महसूली उत्पन्नातून करण्यात येईल. सदरील कर्जाची परतफेड नाही केल्यास लातूर शहर महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या वित्त आयोगातून परस्पर कपात करण्याबाबतचा प्रस्ताव याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 63 दिनांक 16/12/2022

विषय:-जिल्हा नियोजन समिती (DPC) अंतर्गत निधी मागणीचा प्रस्ताव सादर करणे बाबत.

संदर्भः- १) सन्मा. अर्चनाताई दत्तू आल्टे, लातूर शहर जिल्हा चिटणीस, भारतीय जनता पार्टी यांचे विनंती पत्र.
२) सन्मा. माजी सदस्य गायगवाड आनंत नवनाथराव यांचे विनंती पत्र.
३) सन्मा. श्री. रविशंकर शिवाजीराव केंद्रे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य, युवा मोर्चा, भाजपा यांचे विनंती पत्र.

प्रस्तावना-

शहरातील विविध भागातील खालील विकास कामे करणेसाठी सन्मा. कार्यकर्ते यांनी मा.आ.श्री. अभिमन्यू पवार यांना पत्र देऊन जिल्हा नियोजन समिती (DPC) अंतर्गत विकास कामे मंजूर करुन लातूर शहर महानगरपालिकेस निधी मंजूर करणेची विनंती केले आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	अं.प.किंमत
१.	प्र.क्र.१३ मध्ये गायकवाड यांचे घर ते गुरव यांचे घर व इतर ठिकाणी रस्ता करणे.	१०.०० लक्ष
२.	प्र.क्र.१३ मध्ये राजहंस कांबळे ते कावळे व इतर ठिकाणी रस्ता करणे.	१०.०० लक्ष
३.	प्र.क्र.१३ मधील चव्हाण ते इंदिरा गांधी शाळा सिमेंट रस्ता करणे.	१०.०० लक्ष
४.	प्र.क्र.१३ बहुजन चौक ते कांबळे यांचे घर सिमेंट रस्ता करणे.	१०.०० लक्ष
५.	राघवेंद्र कॉलनी येथे सिमेंट रोड व नाली काम करणे.	५०.०० लक्ष
६.	तुळजाभवानी नगर येथे रोड व नाली काम करणे.	५०.०० लक्ष
७.	प्र.क्र.१३ मध्ये शिंदे ते नरहरे शाळा सिमेंट रस्ता करणे	१०.०० लक्ष
८.	प्र.क्र.१३ मध्ये नविन नरहरे शाळा ते खाडगाव रोड सिमेंट रस्ता करणे.	१०.०० लक्ष

जिल्हा नियोजन समितीकडुन जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत महानगरपालिकासाठी नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी व नवबौध्द सुधार योजना अंतर्गत नियतव्यय मंजूर होतो.

सदरची कामे कोणत्या योजनेतून प्रस्तावित करावीत याबाबत निर्णय घेणेसाठी सविनय सादर.

निर्णयः-

प्रस्तावित अ.क्र. ०१ ते ०८ कामांची जिल्हा नियोजन समिती मार्फत सन २०२२-२०२३ करिता प्राप्त होणारे अनुज्ञेय निधीतून प्रस्तावित करण्यासाठी निश्चित करण्यांत येऊन अ.क्र. ०१ ते ०४ कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसूचित जाती व नवबौध्द वस्ती सुधार योजनेतून, अ.क्र.०५ ते ०८ ही कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेतून किंवा नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेतूच्या अनुज्ञेय निधीतून तांत्रिक मान्यतेसह परिपूर्ण प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यांत येते. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत प्राप्त होणारा निधीचा ३०% म.न.पा.हिस्सा १५ वा वित्त आयोग अथवा इतर अनुज्ञेय निधीतून किंवा म.न.पा. फंडातून देण्यांस मान्यता देण्यांत आली.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रस्तावः- ठराव क्रं. 64 दि. 21/12/2022

विषयः- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३,१०४ व लेखा संहिता २०११ चे नियम ४२६ अन्वये अर्थसंकल्पाचे पुनर्विनियोजनास मान्यता प्रदान करणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ च्या अ्रथसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन व नविन पाईप लाईन करणे या लेखाशिर्षकात अंदाजपत्रकिय तरतुद भविष्यात होणा-या कामाच्या तुलनेने कमी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३, १०४ व लेखा संहिता २०११ चे नियम ४२६ चे सोवत जोडण्यात आलेल्या नमुना क्रमांक ९० अन्वये सदरील अर्थसंकल्पीय पुनर्विनियोजन करण्यात येत आहे.

नमुना क्रमांक ९०

(नियम क्रमांक ४२६ पहा)

प्रशासक लातूर शहर महानगरपालिका पुनर्वियोजनाचे विवरणपत्र.

	पासुन					ते						
अ.क्र.	प्रधान गौण व सविस्तर शीर्षक	कामांची सेवा इत्यादी	मुळ निधी	आज पर्यंतचा खर्च	उपलब्ध असलेली शिल्लक	प्रधान गौण व सविस्तर शीर्षक	कामांची सेवा इत्यादी	मुळ निधी	आज पर्यंतचा खर्च	उपलब्ध असलेली शिल्लक	रक्कमेतील प्रस्तावित वाढ	शेरा
ग- महसूली भांडवली खर्च						ग- महसूली भांडवली खर्च						
१	१	नवीन रोड /दुरूस्ती	४.५० कोटी	२.४३ कोटी	२.०७ कोटी		घनकचरा व्यवस्थापन	११.०० कोटी	१३.१३ कोटी	-२.१३ कोटी	०.५० कोटी	
२	२	नवीन गटार/ दुरूस्ती	४.५० कोटी	१.२३ कोटी	३.२७ कोटी		घनकचरा व्यवस्थापन	११.०० कोटी	१३.१३ कोटी	-२.१३ कोटी	१.७५ कोटी	
३	४	सिमेंट रोड (हुडको कर्ज/ शासन हमी)	०.५० कोटी	०.००	०.५० कोटी		घनकचरा व्यवस्थापन	११.०० कोटी	१३.१३ कोटी	-२.१३ कोटी	०.४० कोटी	
४	६	मान्यवरांचे पुतळे/कमानी उभारणे/निगा	१.५० कोटी	०.२५८ कोटी	१.४७ कोटी		घनकचरा व्यवस्थापन	११.०० कोटी	१३.१३ कोटी	-२.१३ कोटी	१.२५ कोटी	
५	२८	जैविक घनकचरा प्रकल्प	०.२५ कोटी	०.०१ कोटी	०.२४ कोटी		घनकचरा व्यवस्थापन	११.०० कोटी	१३.१३ कोटी	-२.१३ कोटी	०.२० कोटी	
६	३४	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कंपोस्ट खत मशिन	०.२० कोटी	०.००	०.२० कोटी		घनकचरा व्यवस्थापन	११.०० कोटी	१३.१३ कोटी	-२.१३ कोटी	०.१५ कोटी	
७	४६	सौरउर्जा प्रकल्प	०.०२ कोटी	०.००	०.०२ कोटी		नवीन पाईपलाईन	०.२५ कोटी	०.२४५ कोटी	०.००४ कोटी	०.०१५ कोटी	
८	४७	फिरता दवाखाना	०.०२ कोटी	०.००	०.०२ कोटी		नवीन पाईपलाईन	०.२५ कोटी	०.२४५ कोटी	०.००४ कोटी	०.०१५ कोटी	
९	४८	नविन दवाखाना	०.०५ कोटी	०.००	०.०५ कोटी		नवीन पाईपलाईन	०.२५ कोटी	०.२४५ कोटी	०.००४ कोटी	०.०४५ कोटी	
१०	४९	सिटी स्कॅन / सोनोग्राफी / एक्स- रे मशिन खरेदी	०.०५ कोटी	०.००	०.०५ कोटी		नवीन पाईपलाईन	०.२५ कोटी	०.२४५ कोटी	०.००४ कोटी	०.०४५ कोटी	
११	५०	प्रभाग तिथे उद्यान व बालउद्यान विकसीत करणे	०.१० कोटी	०.००	०.१० कोटी		नवीन पाईपलाईन	०.२५ कोटी	०.२४५ कोटी	०.००४ कोटी	०.०९ कोटी	
१२	५१	प्र.क्र. १६ मध्ये चैत्यभुमीच्या धर्तीवर कमान बांधणे	०.०५ कोटी	०.००	०.०५ कोटी		नवीन पाईपलाईन	०.२५ कोटी	०.२४५ कोटी	०.००४ कोटी	०.०४५ कोटी	

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३, १०४ व लेखा संहिता २०११ चे नियम ४२६ चे उक्त नमुना क्रमांक१० नुसार करण्यात आलेल्या सदरील अर्थसंकल्पीय पुनर्विनियोजनास मान्यता प्रदान करणे बाबत निर्णय घेणेकरीता प्रस्तावास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव,

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

<u>प्रशासकीय ठराव</u>

<u>लातूर शहर महानगरपालिका,लातूर</u>

ठराव क्रमांक 65 दिनांक 5/1/2023

<u>प्रस्तावः-</u>

लातूर शहर म.न.पा. हद्दीतील सि.टी.एस.नं. ४५८०मधिल जुने न्यायालय येथील बाजूने जाणारा सार्वजनीक रस्ता हारस्त्याची रूंदीकरण करून १५ मी रूंद करण्यासाठी जागा संपादन करणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिकेच्या विकास योजनेतील सि.टी.एस.नं ४५८० मधिल जुने न्यायालय येथील बाजून जाणा-या सार्वजनिक रस्ताजवळ अशोक हॉटेल येथे ट्रफीक सिग्नल असून त्या ठिकाणी सदरचा रस्ता लहान असल्यामुळे येथे वारंवार वाहतुक कोंड होण्याची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे जुने शासकीय विश्राम गृह येथील सार्वजनिक रस्ताच्या रूंदीकरण करून रहदारी करीता उपयुक्त ठरणार आहे. त्याअनुषंगाने जुने शासकीय विश्राम गृहाच्या पश्चिमेकडील विद्यमान ७ मी रूंद रस्ता रूंदीकरण करून १५ मी करणे करिता महानगरपालिका अधिनयम १९४९ चे कलम २०५ व २०६ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२५ व भूमीसंपादन,पुनर्वसन पुनर्वसाहत करता उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अन्वये विद्यामान ७ मी रूंद सार्वजनिक रस्ताच्या रूंदीकरण करून १५ मी रूंद करणाच्या अनुषंगाने जमीन संपादन करण्यासाठी करून विचार विनियम करून निर्णय घेणेस्तव सादर.

निर्णयः-लातूर शहर महानगरपालिकेच्या हद्दतील सि.टी.एस.नं ४५८० मधिल जुने न्यायालय येथील बाजून जाणा-या सार्वजनिक रस्ताजवळ अशोक हॉटेल येथे ट्रफीक सिग्नल असून त्या ठिकाणी सदरचा रस्ता लहान असल्यामुळे येथे वारंवार वाहतुक कोंड होण्याची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे जुने शासकीय विश्राम गृह येथील सार्वजनिक रस्ताच्या रूंदीकरण करून रहदारी करीता १५ मी रस्ता करता यावे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र

Scanned with OKEN Scanner

महानगरपालिका अधिनयम १९४९ चे कलम २०५ व २०६ अन्वये व २०६ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२५ व भूमीसंपादन,पुनर्वसन पुनर्वसाहत करता उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अन्वये विद्यामान ७ मी रूंद सार्वजनिक रस्ताच्या रूंदीकरण करून १५ मी रूंद करणाच्या अनुषंगाने १/- रूपाया नाममात्र शुल्कांच्या अनुषंगाने लातूर शहर महानगरपालिकेस लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्सहान नियमावलीत नियमन्वये भविष्यात संदपादना अंतर्गत क्षेत्राकरिता T.D.R अनुज्ञेय राहिल.तरी ठरावास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं.------66-----ठराव क्रं.------66---------- दिंनाक 13/०२/२०२२

प्रस्ताव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण आठ नियम ४१ नुसार तसेच मनपा सर्वसाधारण सभा दि-२०/९/२०१२ ठराव क्रं.१७ अन्वये प्रतिमहा २% प्रमाणे थकबाकी करावर व्याज/शास्तीची आकारणी करण्यात आलेल्या रककमेस कराधान प्रकरण आठ नियम ५१ अन्वये सूट देणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने तसेच थकबाकी करावर नियम ४१ अन्वये आकरण्यात आलेल्या व्याज शास्तीची रक्कम ४५.२७ कोटी व्याजाची आकारणी करण्यात आली आहे.तसेच मनपा अधिनियम १९४९ कराधान प्रकरण आठ नियम ५१ अन्वये मा.आयुक्त यांना आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ अन्वये आकारण्यात आलेल्या शास्तीवर अंशःता किंवा पूर्णःता माफ करण्याची तरतूद आहे.उपरोक्त तरतुदी अन्वये क्षेत्रीय अधिकारी व मालमत्ताधारकाच्या मागणीनुसार व्याजामध्ये सूट देणे आवश्यक आहे.तसेच थकीत मालमत्ताकरावर आकारण्यात आलेल्या व्याजाची/शास्तीची रक्कम मोठया प्रमाणात थकीत असल्याने मालमत्ताधारक मालमत्ताकराचा भरणा करण्यास्तव टाळाटाळ करीता आहेत.व याचा परिणाम मालमत्ताकराच्या वसूलीवर जाणवत आहे.

करिता व्याज /शास्तीमध्ये काही अंशी सूट दिल्यास मालमत्ताधारक कर भरणा करण्यास प्रवृत्त होतील व यामुळे मनपाच्या अर्थिक उत्पनामध्ये वाढ होईल.

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय विषयांकित प्रकरणा बाबत विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने तसेच थकबाकी करावर नियम ४१ अन्वये आकरण्यात आलेल्या व्याज शास्तीची रक्कम ४५.२७ कोटी वसूल होणे बाकी आहे. तसेच मनपा अधिनियम १९४९ कराधान प्रकरण आठ नियम ५१ अन्वये मा.आयुक्त साहेब यांना आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ अन्वये आकारण्यात आलेल्या शास्तीवर अंशःता किंवा पूर्णःता माफ करण्याची तरतूद आहे.तरी लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताधारकांस आकारण्यात आलेल्या व्याज/शास्ती मध्ये दिं.०७ फेब्रुवारी २०२३ ते १७ फेब्रुवारी २०२३ पर्यंत सर्व कराची एकरक्कमी भरणा करतील अशा मालमत्ताधारकास व्याज/शास्तीमध्ये १००% सूट देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

ठराव क्र. 67 दिनांक 14/02/२०२३

विषय :- ई-निविदा क्र. ४०/२०२२-२३ अन्वये मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनिमय करून निर्णय घेणे बाबत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजना अंतर्गत Making of Digital School and Electrification , Electrification of Sabhagruh, Supplying and erecting Mini Highmast . Installation of Heritage Light and Digital Board at various prabhag under Lokshahir Annabhau Sathe Nagri Anusuchit Jati and Navboudha Wasti Sudhar Yojana in Latur City या कामासाठी ई-निविदा क्र. 40/2022-23 अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर ई-निविदेची किंमत रु. 1,01,66,254/- आहे. त्यानुसार सदर कामासाठी खालील ०५ (पाच) निविदाधारक सहभागी झाले होते.

1) प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स, सांगली.
2) अश्विनी इलेक्ट्रीकल्स, लातूर.
3) दत्तकृपा विद्युतकाम औद्योगिक सहकारी संस्था लि., लातूर.
4) टेकइलेक्ट इंजिनिअरींग प्रा.लि., लातूर
5) गिफॉन इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., लातूर.

वरील एजन्सीधारकांचा लिफाफा क्र. १ (Technical Bid) दि. 04/10/2022 रोजी उघडण्यात आला. कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करत असताना निविदा सुचितीने 1) प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स, सांगली 2) अश्विनी इलेक्ट्रीकल्स, लातूर व 3) दत्तकृपा विद्युतकाम औद्योगिक सहकारी संस्था लि., लातूर यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने त्यांना पात्र करण्यात आले व 1) टेकइलेक्ट इंजिनिअरींग प्रा.लि., लातूर 2) गिफॉन इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., लातूर यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्र सादर केले नसल्याने त्यांना अपात्र करण्यात आले.

त्याअनुषंगाने निविदेचा पात्र निविदाधारकांचा लिफाफा क्र. 02 (दरपत्रक) दि. 21/10/2022 रोजी उघडण्यात आला. निविदाधारक यांनी सदर कामासाठी खालीलप्रमाणे दर दिले आहेत.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	दिलेले दर
1	प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स	अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी
2	अश्विनी इलेक्ट्रीकल्स, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा 1.00% अधिक
3	दत्तकृपा विद्युतकाम औद्योगिक सहकारी संस्था लि. लातूर.	अंदाजपत्रक दरापेक्षा 1.50% अधिक

सदर कामासाठी न्युनतम 1 निविदाधारक प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स, लातूर यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी या दराची निविदा मंजूर करणेसाठी निर्णयारत्व सादर.

निर्णय :- Making of Digital School and Electrification , Electrification of Sabhagruh, Supplying and erecting Mini Highmast . Installation of Heritage Light and Digital Board at various prabhag under Lokshahir Annabhau Sathe Nagri Anusuchit Jati and Navboudha Wasti Sudhar Yojana in Latur City या कामासाठी ई-निविदा क्र. 40/2022-23 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स सांगली यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 0.99% कमी दराची निविदा आहे. निविदाकार प्रिकॉशन इलेक्ट्रीकल्स, सांगली यांनी निविदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 68 दि. 14/02/2023

विषय - नळ नसताना किंवा एकाच नावावर दोन नोंदी असलेल्या ग्राहकांचे देयका बाबत प्रशासकीय मान्यता देणे.

प्रस्ताव -

लातूर शहराचा पाणी पुरवठा हा साल-सन 2010-2014 पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असल्यामुळे त्यांनी साल-सन 2014 ला नळाच्या नोंदी आपल्याकडे हस्तांतरीत केले.

1. लातूर शहर पाणी पुरवठा अंतर्गत लातूर शहरातील ब-याच मालमत्ता धारकांचे नावावर दोन नळाचे नोंदी आहेत तसेच त्यांच्याकडे नळ कनेक्शन नसताना मालमत्ता धारकांचे नावाचे नोंदी घेण्यात आले आहेत.
2. तसेच ब-याच ठिकाणी पाईप लाईन नसताना ज्या भागातील नळ कनेक्शनच्या नोंदी संगणकामध्ये घेण्यात आले आहेत. परंतू सद्यस्थितीत पाणी पट्टी देयके हे मालमत्ता करात समाविष्ठ करण्यांत आले असल्यामुळे ज्या मालमत्ता धारकांकडे नळ कनेक्शन नाही अशा मालमत्ता धारकांना सुध्दा पाणी कर आकारण्यात आलेले आहे.
3. तसेच ज्यांच्याकडे एकच नळ कनेक्शन असताना परंतू नळाची नोंद ही दोन किंवा अधिक असल्याने पाणी देयके जास्तीचे आकारण्यात येत आहे.
4. तसेच काही तक्रार अर्ज प्राप्त झाले असतानाही ते प्रलंबित असल्या कारणाने संबंधित जलकुंभाचे शाखा अभियंता यांनी तक्रार अर्जावर स्थळ पाहणी करुन नळ नसले बाबत तसेच एकच नळ कनेक्शन असल्याचे पंचनामे करुन कार्यालयात सादर केले आहेत.
5. ब-याच प्राप्त अर्जावरुन नळाचा घरगुती वापर असताना त्याच्या नोंदी मिश्र अशा झालेल्या आहेत.
6. तसेच पाणी पट्टी देयके हे घरपट्टी मध्ये एकत्रीकरण केल्यामुळे त्रुटीचे (अतिरीक्त वाढीव पाणी पट्टी देयके) प्राप्त झालेले अर्जाची यादी तयार केली आहे.
7. पाणी पट्टी देयके संचिका क्रं. 1 अनु क्रं. 1 चे (1 ते 581) पर्यंत व अनु क्रं. 2 चे (1 ते 520) कमी करण्यासाठी यादी सोबत सादर करण्यांत येत आहे.

अनु क्रं.	तपशील	ग्राहकांची संख्या	देयकातुन कमी करण्यांत येणारी रक्कम
1	नळ कनेक्शन नसलेले	581	22,22,406/-
2	नळ कनेक्शन असताना बिल जास्त आलेले	520	60,71,626/-
	एकुण	**1101**	**82,94,032/-**

तरी सोबत जोडलेल्या तक्रार अर्जावर उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय :- सध्या पाणी पट्टीचे देयके हे घरपट्टी मध्ये एकत्रित केल्यामुळे नागरिकाच्या थकबाकीबद्दल, नळ नसताना नळ कनेक्शन दाखवले बाबत, घरगुती वापर असताना व्यावसायिक वापर दाखवले बाबत, इ. च्या तक्रारी प्राप्त होत्या. सदर तक्रारीची शहानिशा करुनच पाणी पट्टीची देयके सुधारित करण्यांत यावी. याबाबत मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात येत असुन थकबाकी व इतर रक्कम कमी करण्यांस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 69 दिनांक 14/02/2023

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन अंतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधामधील नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा कमी करणे व मनपा स्व-हिश्श्याचा निधी उभारणे बाबत.

संदर्भ - शासन निर्णय नगर विकास विभाग क्रं. अमृत 2022 / प्र. क्रं. 141 / नवि-33 दि. 14 जुलै 2022

प्रस्ताव -

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत लातूर महानगरपालिकेचा पाणी पुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्पाचा समावेश कृती आराखडयात समाविष्ठ करण्यात आलेला आहे. संदर्भीय शासन निर्णयान्वये केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यामध्ये अमृत 2.0 अभियांन राबविण्यास शासन मान्यता दिली. आहे. अमृत 2.0 अभियानांतर्गत नागरी स्वराज्य स्थानिक संस्थांमार्फत सादर होणा-या प्रकल्पांसाठी एकुण प्रकल्प किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व नागरी स्वराज्य संस्थांचा अर्थिक हिस्स्याचे वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे राहील.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार	केंद्र शासन हिस्सा (%)	राज्य शासन हिस्सा (%)	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (%)
'ड' वर्ग महानगरपालिका	33.33	36.67	30

केंद्र शासन अमृत 1.0 अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा 25% एवढा होता. तथापि अमृत 2.0 अंतर्गत नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा 30% एवढा ठेवण्यात आलेला आहे. वस्तुतः महानगरपालिकेच्या अर्थिक स्थिती पाहता महानगरपालिकेच्या स्व-हिस्स्यासाठी निधी उभारणी करणे अर्थिक दृष्ट्या अवघड आहे. सबब सदर अमृत 2.0 अभियानांतर्गत निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधानुसार ड वर्ग महानगरपालिकेचा नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा 30% वरुन 25% करण्या करिता निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे पुनर्विचार करणे आवश्यक आहे. तसेच मनपाच्या स्व-हिश्श्याच्या निधीची उभारणी करणेकरिता महानगरपालिकेने मनपा फंड, म्युनिसीपल बॉन्ड, कर्ज, राज्य शासनाने अनुदान, केंद्रीय वित्तीय आयोग अनुदान, इ. मधुन स्व-हिश्श्याची उभारणी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता करणे योग्य वाटते, याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

निर्णय :-

अमृत 2.0 अंतर्गत नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा 30% एवढा ठेवण्यात आलेला आहे. वस्तुतः महानगरपालिकेच्या अर्थिक स्थिती पाहता महानगरपालिकेच्या स्वहिस्स्यासाठी निधी उभारणी करणे अर्थिक दृष्ट्या अवघड आहे. सबब सदर अमृत 2.0 अभियानांतर्गत निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील वित्तीय आकृतीबंधानुसार 'ड' वर्ग महानगरपालिकेचा नागरी स्वराज्य संस्थेचा हिस्सा 30% वरुन 25% करण्या करिता शासनाकडे मंजुरीकरिता पाठविण्यात यावा. अमृत 2.0 अभियांनासाठी स्व-हिश्श्याच्या निधीची उभारणी करणेकरिता महानगरपालिकेने मनपा फंड, म्युनिसीपल बॉन्ड, कर्ज, राज्य शासनाचे अनुदान, केंद्रीय वित्तीय आयोग अनुदान यांचा वापर करण्यास मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 70 दिनांक 24/02/2023

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियानाची लातूर शहर महानगरपालिकेमध्ये अंमलबजावणी करण्या बाबत.

संदर्भ - 1. शासन निर्णय नगर विकास विभाग क्रं. अमृत 2022 / प्र. क्रं. 141 / नवि-33 दि. 14 जुलै 2022
2. मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचे दालनात आयोजित बैठक दि. 17.10.2022
3. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा अहवाल दि. 28.10.2022
4. कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्रं. 1 यांचा प्राप्त ई-मेल दि. 01.11.2022

प्रस्ताव –

केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत लातूर महानगरपालिकेचा पाणी पुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्पाचा समावेश कृती आराखडयात समाविष्ठ करण्यात आलेला आहे. संदर्भ क्रं. 1 अन्वये केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यामध्ये अमृत 2.0 अभियांन राबविण्यास शासन मान्यता दिली. आहे. अमृत 2.0 अभियानांतर्गत नागरी स्वराज्य स्थानिक संस्थांमार्फत सादर होणा-या प्रकल्पांसाठी एकुण प्रकल्प किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व नागरी स्वराज्य संस्थांचा अर्थिक हिस्स्याचे वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे राहील.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार	केंद्र शासन हिस्सा (%)	राज्य शासन हिस्सा (%)	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (%)
'ड' वर्ग महानगरपालिका	33.33	36.67	30

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियांन 2.0 अंतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा व मलनिःस्सारण योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम चालु असुन सदर विषयाबाबत संदर्भ क्रं. 2 अन्वये मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचे दालनात बैठक आयोजित करण्यांत आली होती. या बैठकीत मा. उपायुक्त, लातूर शहर महानगरपालिका, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर व उपकार्यकारी अभियंता लातूर पाटबंधारे विभाग हे उपस्थित होते. मा. जिल्हाधिकारी, लातूर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पाटबंधारे विभाग यांना निम्न तेरणा प्रकल्प (माकणी) व मांजरा प्रकल्प (धनेगांव) येथुन लातूर शहरास पाणी पुरवठा करणेसाठी नविन उद्भव निर्माण करणेकरिता सदर दोन्ही जलाशयावरती पाणी आरक्षण किती आहे, दुरूस्ती खर्च किती लागु शकते किंवा लातूर शहरासाठी सोईस्कर योजना कोणती राहु शकते याबाबत अहवाल सादर करणे करिता दोन्ही विभागांना निर्देश दिले होते. संदर्भ क्रं. 3 नुसार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर यांनी अहवाल सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

लातूर शहरासाठी अस्तित्वातील योजनेचा उद्भव धनेगांव प्रकल्प (मांजरा प्रकल्प) आहे. सध्या लातूर शहरास सदरील योजनेद्वारे पाणी पुरवठा आपल्यामार्फतच करण्यांत येतो. सदरील योजने अंतर्गत मांजरा प्रकल्पातील बुडीत क्षेत्रातील उद्भव विहीरीपासुन दाभा पाटीपर्यंत 4.25 कि.मी. उध्दरण नलिका आहे. दाभा पाटीपासुन हरंगुळ (बु.) येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत 46.10 कि.मी. गुरुत्व वाहिनी आहे. सदरील प्रकल्पावरुन अमृत 2.0 अंतर्गत नवीन वाढीव पाणी मागणीसाठी योजना प्रस्तावित केल्यास अस्तित्वातील उद्भव व शिर्ष कामाचा उपयोग होणार आहे. तसेच अस्तित्वातील उध्दरण नलिका, गुरुत्व वाहिनी व पंपींग मशिनरीचा

Scanned with OKEN Scanner

२	१	सहाय्यक अधिक्षक (लघुलेखक)	[illegible]	[illegible]	२	२	पदोन्नती - १०० %	सरळसेवा - ०० %	अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अधिक्षक (लघुलेखक) या पदावर किमान ५ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कनिष्ठ अधिक्षक व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचा यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल	अ.आस्थापनेवरील विभागीयरीत्या स्पर्धात्मक परीक्षा अधिकारीकडे सरळसेवा पदाची ब. अमरावती महानगर क्षेत्र आरक्षण
३	२	अधिक्षक वैद्य अधिकारी	[illegible]	[illegible]	१	१	पदोन्नती - १०० % प्रतिनियुक्ती	सरळसेवा - ०० %	अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एस अधिक्षक/अन्न वैद्य अधिकारी या पदावर किमान ५ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिक्षक यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल	अ.आस्थापनेवरील विभागीयरीत्या स्पर्धात्मक परीक्षा अधिकारीकडे सरळसेवा पदाची ब. अमरावती महानगर क्षेत्र आरक्षण
४	२	कर अधिक्षक	[illegible]	[illegible]	१	१	पदोन्नती - १०० %	सरळसेवा ५० % पदोन्नती ५० %	अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक कर अधिक्षक या पदावर किमान ५ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व माध्यमप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करणाऱ्या व शासन विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचा यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल	अ.आस्थापनेवरील विभागीयरीत्या स्पर्धात्मक परीक्षा अधिकारीकडे सरळसेवा पदाची ब. अमरावती महानगर क्षेत्र आरक्षण
५	२	सहाय्यक कर अधिक्षक	[illegible]	[illegible]	४	४	पदोन्नती - १०० %	सरळसेवा ५० % पदोन्नती ५० %	अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर लिपीक या पदावर किमान ५ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व माध्यमप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करणाऱ्या व शासन विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचा यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल	अ.आस्थापनेवरील विभागीयरीत्या स्पर्धात्मक परीक्षा अधिकारीकडे सरळसेवा पदाची ब. अमरावती महानगर क्षेत्र आरक्षण

2	3	पदाचा तपशील	वेतनश्रेणी	ग्रेड पे	आकृतीबंधा प्रमाणे मंजूर पदांची संख्या	81 पदे सरळसेवेने भरण्यास शासनाची मान्यता	सेवाप्रवेश नियमात नेमणुकीची पध्दत व टक्केवारी	प्रस्तावित नेमणुकीची पध्दत व टक्केवारी	सेवाप्रवेश नियमावलीत दर्शविलेली नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती	प्रस्तावित नेमणुकीकरिता अर्हता
		3	4	5	6	7	8	9	10	11
6	3	चालक - यंत्रचालक	5200-20200	1900	18	9	नामनिर्देशन/सरळसे वा 25 % पदोन्नती 75 %	सरळसेवा 50% पदोन्नती 50%	सरळसेवा - अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण. ब) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण. क) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक. ड) जड वाहन चालक म्हणून किमान 3 वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक. इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. फ) शारीरिक पात्रता:- 1. उंची किमान 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान 162 सें.मी.) 2. छाती- साधारण 81 सें.मी. फुगवून-5 सें.मी.जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.) 3. वजन- किमान 50 कि.ग्रॅ. 4. दृष्टी- चांगली. ग) वयोमर्यादा:- उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा अधिक असू नये. पदोन्नती लातूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशामक या पदावर किमान 3 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व नामनिर्देशनासाठी विहत केलेली अर्हता धारण करणा-या कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.	सरळसेवा - अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण. ब) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण. क) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक. ड) जड वाहन चालक म्हणून किमान 3 वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक. इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. फ) शारीरिक पात्रता:- 1. उंची किमान 165 सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान 162 सें.मी.) 2. छाती- साधारण 81 सें.मी. फुगवून-5 सें.मी.जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.) 3. वजन- किमान 50 कि.ग्रॅ. 4. दृष्टी- चांगली. ग) वयोमर्यादा:- उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा अधिक असू नये. पदोन्नती - लातूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशामक या पदावर किमान 3 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व नामनिर्देशनासाठी विहत केलेली अर्हता धारण करणा-या कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - 115 दिनांक. 13/04/2023

विषय - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका मलनि:स्सारण प्रकल्पातील पंपींग मशिनरी चे निविदा दर मंजुरी बाबत.

प्रस्ताव

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका मलनि:स्सारण प्रकल्पातील पंपीग मशिनरीचे कामे करणेसाठी दर ई-निविदा (तिसरी वेळ) सूचना क्रमांक 13 / 2022-23 निवीदा आय डी. क्र 2023_ LMC_874946_1 मागवण्यात आली होती. निविदा बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

1. निविदा मागवलेला कालावधी दि. 18 /02 / 2023 ते 28 / 02 / 2023
2. मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बीड रिपोर्ट वरून निर्देशनास आलेनुसार दि.03/03/2023 रोजी प्राप्त 3 निविदाचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. प्राप्त तीन निवीदा धारकाचे कागदपत्राची छाननी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर यांनी केले नंतर तीन्ही निवीदा पात्र असल्याने निविदाचा आर्थिक लिफाफा दि. 15/03/2023 रोजी उघडण्यात आला.
3. प्राप्त निविदा दराबाबत माहिती खालील विवरणामध्ये सादर.

अ.क्र	निविदाधारकाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	मे. व्रज कन्स्ट्रक्शन	4,19,74,483.00/-	(0.100 % जास्तीने) रक्कम रू. 4,20,16,457.480
2	अलाईड इलेक्ट्रो मेकॅनिकल प्रा.लि.		(3.550% जास्तीने) रक्कम रू. 4,34,64,577.150
3	मे.लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर		(-2.100 % कमीने) रक्कम रू. 4,10,93,018.860

वरील प्रमाणे तीन निविदाचे दर प्राप्त झाले असनु प्राप्त निविदा दरापैकी सर्वात कमीचे निविदा दर मे.लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर यांचे अंदाजपत्रक रक्कम रू.4,19,74,483.00 दरापेक्षा -2.100% कमीने आहेत. म्हणजे 4,10,93,018.860 रूपये आहे.

तरी मे.लक्ष्मी इंजिनीअरींग, चाकूर यांचे सर्वात कमीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर

निर्णय -

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका मलनि:स्सारण प्रकल्पातील पंपींग मशिनरीचे कामे करणेसाठी मे.लक्ष्मी इंजिनीअरींग, चाकूर यांचे सर्वात कमीचे दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. वरील कामाचे कार्यादेश देऊन तात्काळ कामे करून घेण्यात यावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 116 दि. 26/04/2023

विषय - नळ नसताना किंवा एकाच नावावर दोन नोंदी असलेल्या ग्राहकांचे देयका बाबत प्रशासकीय मान्यता देणे.

प्रस्ताव -

लातूर शहराचा पाणी पुरवठा हा साल-सन 2010-2014 पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असल्यामुळे त्यांनी साल-सन 2014 ला नळाच्या नोंदी आपल्याकडे हस्तांतरीत केले.

1. लातूर शहर पाणी पुरवठा अंतर्गत लातूर शहरातील ब-याच मालमत्ता धारकांचे नावावर दोन नळाचे नोंदी आहेत तसेच त्यांच्याकडे नळ कनेवशन नसताना मालमत्ता धारकांचे नावाचे नोंदी घेण्यात आले आहेत.
2. तसेच ब-याच ठिकाणी पाईप लाईन नसताना त्या भागातील नळ कनेवशनच्या नोंदी संगणकामध्ये घेण्यात आले आहेत. परंतू सद्यस्थितीत पाणी पट्टी देयके हे मालमत्ता करात समाविष्ठ करण्यांत आले असल्यामुळे ज्या मालमत्ता धारकांकडे नळ कनेवशन नाही अशा मालमत्ता धारकांना सुध्दा पाणी कर आकारण्यात आलेले आहे.
3. तसेच ज्यांच्याकडे एकच नळ कनेवशन असताना परंतू नळाची नोंद ही दोन किंवा अधिक असल्याने पाणी देयके जास्तीचे आकारण्यात येत आहे.
4. तसेच काही तक्रार अर्ज प्राप्त झाले असतानाही ते प्रलंबित असल्या कारणाने संबंधित जलकुंभाचे शाखा अभियंता यांनी तक्रार अर्जावर स्थळ पाहणी करुन नळ नसले बाबत तसेच एकच नळ कनेवशन असल्याचे पंचनामे करुन कार्यालयात सादर केले आहेत.
5. ब-याच प्राप्त अर्जावरुन नळाचा घरगुती वापर असताना त्याच्या नोंदी मिश्र अशा झालेल्या आहेत.
6. तसेच पाणी पट्टी देयके हे घरपट्टी मध्ये एकत्रिकरण केल्यामुळे त्रुटीचे (अतिरीक्त वाढीव पाणी पट्टी देयके) प्राप्त झालेले अर्जाची यादी तयार केली आहे.
7. पाणी पट्टी देयके संचिका क्रं. 1 अनु क्रं. 1 चे (1 ते 631) पर्यंत व अनु क्रं. 2 चे (1 ते 266) कमी करण्यासाठी यादी सोबत सादर करण्यांत येत आहे.

अनु क्रं.	तपशील	ग्राहकांची संख्या	देयकातुन कमी करण्यांत येणारी रक्कम
1	नळ कनेक्शन नसलेले	631	18,95,947.00
2	नळ कनेक्शन असताना बिल जास्त आलेले	266	26,14,284.00
	एकुण	**897**	**45,10,231.00**

तरी सोबत जोडलेल्या तक्रार अर्जावर उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय :- सध्या पाणी पट्टीचे देयके हे घरपट्टी मध्ये एकत्रित केल्यामुळे नागरिकाच्या थकबाकीबद्दल, नळ नसताना नळ कनेक्शन दाखवले बाबत, घरगुती वापर असताना व्यावसायिक वापर दाखवले बाबत, इ. च्या तक्रारी प्राप्त होत्या. सदर तक्रारीची शहानिशा करुनच पाणी पट्टीची देयके सुधारित करण्यांत यावी. याबाबत मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात येत असुन थकबाकी व इतर रक्कम कमी करण्यांस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

मा. प्रशासकीय ठराव विषय क्र. ठराव क्र. 117 दिनांक: 26/04/2023

विषयः- लातूर शहर हददीमधे महिलांना परिवहन बस सेवेमधे मोफत प्रवास देणे बाबत

प्रस्तावः-

लातूर शहर परिवहन बस सेवे मधे महिलांना मोफत प्रवास खर्चात कपात करणेच्या दृष्टीने दि. ०७/०२/२०२३ रोजी मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली अभिकर्ता, मा. मुख्य लेखापाल, मा. मुख्य लेखापरिक्षक व परिवहन विभाग प्रमुख यांची बैठक घेण्यात आली. त्यामधे अभिकर्ता यांनी इंधन मनपाने पुरवठा करणे तसेच दरमहा देयकातुन इंधन देयक कपात करून मोबदला वेळेत अदा करणेची मागणी केली. त्यानुसार मा. आयुक्त यांनी अभिकर्ता यांना इंधन देणे खर्चात कपात होणेच्या दृष्टीने पथक निर्माण करुन त्यांनी शहर बस सेवेत एक बस मधे किती महिला शहर हददी अंतर्गत व शहर हददी बाहेर किती महिला प्रवास करतात याचा अहवाल प्रत्येक महिन्याला देणेचे ठरले. तसेच उपरोक्त बाबीवर निर्णय घेणे करिता समिती गठीत करणेत आली.

उक्त समिती मार्फत अभिकर्ता यांना इंधन देणे, उपरोक्त बाबीवर निर्णय घेणे व खर्चात कपात होणेच्या दृष्टीने पथक निर्माण करुन त्यांनी शहर बस सेवेत एका बस मधे किती महिला शहर हददी अंतर्गत व शहर हददी बाहेर किती महिला प्रवास करतात याचा अहवाल प्रत्येक महिन्याला सादर करणे तसेच त्या महिलांनी केलेला प्रवासाचा मोबदला अभिकर्त्यास कोणत्या प्रमाणात व किती दयावा याचा निर्णय घेणेसाठी व अहवाल सादर करणेसाठी शहर बस सेवेच्या ०८ मार्गावर पाहणी करणे, नोंद घेणे व सदरील माहिती लिखीत स्वरुपात सादर करणेसाठी ०८ कर्मचा-यांची नियुक्ती दि. २३/०२/२०२३ चे पत्राने मा. उपायुक्त यांनी केली आहे. त्यानुसार सदरील ०८ कर्मचा-यांनी त्यांचा मार्ग निहाय अहवाल खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

अ.क्र.	मार्ग	वाहन क्रमांक	हददीत प्रवास केलेल्या महिलांची संख्या	सरासरी संख्या
१	गंजगोलाई ते धनेगाव	MH24-AU-4570	१०५९	५०
२	गंजगोलाई ते १२ नं पाटी	MH24-AU-4862	१०४०	५०
३	गंजगोलाई ते मेडिकल कॉलेज	MH24-AU-2031	१०५०	५०
४	गंजगोलाई ते भातांगळी	MH24-AU-4793	१४९	७
५	गंजगोलाई ते बाभळगाव	MH24-AU-4430	१५६	७
६	गंजगोलाई ते गंगापुर	MH24-AU-2028	९८१	४७
७	गंजगोलाई ते १२ नं पाटी	MH24-AU-2029	१०१४	४८
८	गंजगोलाई ते गंगापुर	MH24-AU-4494	१०३८	५०

उपरोक्त अहवाल हा दि. २७/०२/२०२३ ते दि. ०६/०३/२०२३ सकाळ, दुपार व सायंकाळ यावेळेत प्रत्यक्ष मार्गावर शहर बसमधे प्रवास करुन घेण्यात आलेला आहे.

निर्णयः-

१) प्रति फेरी ३० महिला गृहित धरुन रु. १०/- प्रति महिला प्रमाणे तिकीट मोबदला देणे योग्य.
२) मुळ करारा प्रमाणे अभिकर्त्याकडुन रॉयल्टी प्रति कि.मी. प्रमाणे रॉयल्टी कपात करणे योग्य.
३) अभिकर्त्याच्या मागणी प्रमाणे रु. १०.०० लक्ष च्या मर्यादेमधे मनपा मार्फत इंधन पुरवठा करुन मासीक देयकातुन
वसुल करणे योग्य.

नगरसचिव
लातूर श. महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर श. महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं.---~~118~~---ठराव क्रं.---~~118~~ 118---- दिंनाक 24/05/२०२३

विषयः- मा.प्रशासक यांच्याकडे प्रस्ताव सादर.

" लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील 2023-24 या आर्थीक वर्षातील चालू वर्षाच्या मालमत्ता करामध्ये सुट देणे बाबतचा विषय विचार विनिमय करून निर्णय घेण्यास्तव सादर."

प्रस्तावनाः-

15 व्या वित्त आयोगाच्या निधी वाटपाचे धोरण थेट म.न.पाच्या कर वसुलीशी जोडले असल्यामुळे जास्तीत जास्त कर वसुली झाली तरच महानगरपालिकेस 15 व्या वित्त आयोगाचा निधी मिळणेसाठी पात्र होईल.

दि. 14/03/2023 रोजी च्या मा. मुख्यसचिव यांनी घेतलेल्या आढावा बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्र. 1(3) नुसार, सन 2023-24 करिता वसुलीची टक्केवारी वाढवण्यासाठी विशेष योजना राबविणे आवश्यक आहे.

लातूर शहर महानगरपालिका हाद्दीतील मालमत्ता कराची वसुलीचा वेग वाढविण्याच्या दृष्टीकोणातून महारष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील (कलम 140 अ व 140 ब अन्वये) मालमत्ता करामध्ये सुट देण्याचे आधिकार असून त्याप्रमाणे मुदतीपूर्व कर भरणाऱ्या नागरीकांना मालमत्ता करामध्ये 2% सुट दिल्यास मार्च-2024 पर्यंत वसुलीची टक्केवारी वाढण्यास मदत होईल.

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कराच्या वसुलीचा वेग वाढविण्याच्या दृष्टीकोणातून व बांधकामाप्रमाणे मालमत्ता कर आकारणीच्या कक्षेत आलेल्या मालमत्तेस महारष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 140 अ व 140 ब अन्वये मालमत्ता करामध्ये सुट देण्याचे आधिकार असून त्याप्रमाणे मालमत्ता धारकास खालील प्रमाणे सुट देण्याय येत आहे.

1. 2023-24 या आर्थीक वर्षातील पुर्ण कराचा भरणा केल्यास **31 जुलै 2023 पर्यंत 5% मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत.**
2. 2023-24 या आर्थीक वर्षातील पुर्ण कराचा भरणा केल्यास **31 ऑगस्ट 2023 पर्यंत 4% मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत.**
3. 2023-24 या आर्थीक वर्षातील पुर्ण कराचा भरणा केल्यास **30 सप्टेंबर 2023 पर्यंत 3% मालमत्ता करामध्ये सुट देण्यात येत.**

जे मालमत्ता धारक उक्त देण्यात आलेल्या सुट मध्ये आपल्याकडील मालमत्ता कराचा भरणा करणार नाहित, अश्या मालमत्ता धारकावर महाराष्ट्र महानगर पालिका अधिनीयम 1949 मधील तरतुदी प्रमाणे 2% शास्तीची प्रतीमहा आकारणी करुन वसुली करण्यात यावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांकः- 119 दिनांकः- 24/05/2023

प्रस्ताव-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत लांतूर शहरातील रस्ते विकासाचे विविध प्रकल्प योजना कामे पूर्ण करणेसाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत(MUDICL) मुन्क्रामार्फत कर्ज व अनुदान स्वरुपात निधी मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत(MUDICL) मुन्क्रा यांच्या सर्व नियम व अटीबाबत विचारविनीमय करुन निर्णय घेणेबाबत.

सादरः- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानअंतर्गत लातूर शहर महागनरपालिकेचा रस्ते विकास प्रकल्पास प्रशासकीय मान्यता शासन आदेशानुसार मंजूर झाला आहे, तसेच मा.जिल्हाधिकारी, लातूर यांचे प्रशासकीय मान्यतेनुसार शहरातील लोकनेते विलासराव देशमुख मार्ग विकसित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.त्यानुसार सर्व कामांचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत व सर्व कामे प्रगतीपथावर आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाकडुन व जिल्हा नियोजन समितीमार्फत खालीलप्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे तसेच महानगरपालिकेमार्फत म.न.पा.हिस्सा उभारणे आवश्यक आहे सदरची कामे पूर्ण करणेसाठी **खालीलप्रमाणे निधीची आवश्यकता असल्याने महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत(MUDICL) मुन्क्रामार्फत कर्ज व अनुदान स्वरुपात निधी मागणीचा प्रस्ताव प्रशासकीय ठराव क्र. 62 दि.13.12.2022 नुसार पाठविण्यात आलेला होता. यानुसार नगर विकास विभाग यांनी दिनांक 28 फेब्रुवारी 2023 रोजी कर्ज रक्कम रु. 21.5761 कोटी व अनुदान रक्कम 9.2469 कोटी असे एकुण 30.823 कोटी रक्कमेस मान्यता प्राप्त झालेली आहे.**

सदरील कर्ज व अनुदान देणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र शहरी पायाभूत विकास कंपनी लि.मुंबई यांचे पत्र क्रमांक MUIF/PFF-Loans/LMC/2023/416 Date 17.05.2023 अन्वये रु. 20,45,40,000/- कर्ज व अनुदान देणेसाठी खालील नियम व अटीबाबत प्रशासकीय मान्यता देणे बंधनकारक राहील असे कळविले आहे.

1. Borrowing of necessary loan amount Rs.14,31,78,000/- from MUIDCL,
2. Acceptance of all terms and conditions of loan,
3. Arrangement for repayment of loan, intrest thereon and any other charges from Finance commission grants as approved by urban development Dept. and authorizing the state Government in this regard.
4. Opening separate MUIDCL-LRF bank account; and
5. Authorizing the state Govt. to directly deduct grants payble to Municipal Corporation in case of default (UDD letter No.Misc-2023/case No.3/UD-33 date 28th February,2023)

तरी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राज्यस्तर व जिल्हास्तर योजनेचे सर्व कामे पूर्ण करण्यासाठी रु.३०.८२३ कोटी निधी आवश्यकता आहे. सदरील आवश्यक निधी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत (MUDICL) MUINFRA मार्फत कर्ज व अनुदान स्वरुपात उभारणेसाठी म.न.पा.सर्वसाधारण सभा दि.१२.१०.२०२१ ठराव क्र. २१० अन्वये मान्यता प्राप्त असून त्यानुसार सदरील निधी लातूर शहर महानगरपालिकेस महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत(MUDICL) MUINFRA योजनेअंतर्गत कर्ज व अनुदान

Scanned with OKEN Scanner

स्वरुपात मंजूर करण्यात आल्याप्रमाणे सदरच्या कर्ज व अनुदान स्वरुपातील निधीसाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत(MUDICL) MUINFRA कडून देण्यात आलेल्या सर्व नियम व अटीबाबत प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

निर्णय

उपरोक्त सादर प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिकेस महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राज्यस्तर व जिल्हास्तर योजनेचे सर्व कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक रु.३०.८२३ कोटीच्या निधीबाबत महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत (MUDICL) MUINFRA यांचेकडे कर्ज व अनुदान स्वरुपात निधी मागणीबाबत पाठविण्यात आलेल्या प्रस्तावानुसार मंजूरी प्राप्त असून मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र शहरी पायाभूत विकास कंपनी लि.मुंबई यांचे पत्र क्रमांक MUIF/PFF-Loans/LMC/2023/416 Date 17.05.2023 अन्वये कर्ज व अनुदानासाठी वरीलप्रमाणे दिलेल्या नियम व अटीबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

ठराव क्रमांक 120 दि. 07/06/2023

.....

प्रस्तावः- मा.प्रशासक यांचेकडे कायदे सल्लागार यांच्या नियुक्तीचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर
विषयः- <u>कायदे सल्लागार यांच्या नियुक्तीबाबत</u>

लातूर शहर महानगरपालिका लातूर विरूध्द व तर्फे प्रलंबित व नव्याने दाखल होणा-या मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व वरिष्ठ स्तर लातूर , मा.जिल्हा न्यायालय, मा.कामगार व औद्योगिक न्यायालय मा.उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ औरंगाबाद उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे न्यायालयीन प्रकरणामध्ये लातूर शहर महानगरपालिकेची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी कायदे सल्लागार / विधीज्ञ यांची आवश्कता असल्यामुळे मा.आयुक्त महोदय यांचे दि.10/05/2023 च्या मान्यतेप्रमाणे कायदे सल्लागार यांचे नियुक्ती बाबत चा प्रस्ताव अवलोकनास्तव सादर केला आहे.

निर्णयः- लातूर शहर महानगरपालिका लातूर विरूध्द व तर्फे प्रलंबित व नव्याने दाखल होणा-या मा.दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व वरिष्ठ स्तर लातूर , मा.जिल्हा न्यायालय, मा.कामगार व औद्योगिक न्यायालय मा.उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ औरंगाबाद उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे न्यायालयीन प्रकरणामध्ये लातूर शहर महानगरपालिकेची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी कायदे सल्लागार / विधीज्ञ यांची आवश्कता असल्यामुळे मा.आयुक्त महोदय यांचे दि.10/05/2023 च्या मान्यतेप्रमाणे कायदे सल्लागार यांचे नियुक्ती बाबत अर्ज मागवणे करिता जाहिर प्रगटण देणे बाबत व कायदे सल्लागार यांच्या नियुक्ती बाबत पुढील प्रक्रीया पुर्ण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 121 दिनांक 07 / 06 /२०२३

विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत कामास मंजूरी देणे बाबत.

प्रस्तावना – नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२३/प्र.क्र.२२७-५/नवि-१६ दिनांक ३१ मार्च २०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांचा विकास सन २०२२-२३ साठी (लेखाशिर्ष (२२१७०९१३) अंतर्गत लातूर महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांसाठी रु. १,००,००,०००/- कोटी निधी मंजूर केला आहे. शासन निर्णयानुसार कार्यान्वयण यत्रणा लातूर शहर महानगरपालिका आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय. किंमत
१	लातूर महानगरपालिका पभाग क्र. १७ मध्ये संत ज्ञानेश्वर नगर यथे रस्ता व नाली करणे	५०,००,०००.००
२	लातूर हानगरपालिका प्रभाग क्र. १८ मध्ये खंदाडे नगर येथे रस्ता व नाली करणे	५०,००,०००.००
	एकूण रुपये	१,००,००,०००.००

तरी वरीलप्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

निर्णय – वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास काम महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत सन २०२२-२०२३ साठी प्राप्त होणा-या निधीमधून उपरोक्त कामे हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका

ठराव क्र. 122 दि. 12/05/2023

प्रस्ताव:-

लातूर शहर महानगरपालिका,लातूरचे सन २०१६-१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७(अ) प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेपूढे ठेवणे बाबत.

लातूर शहर महानगरपालिका लातूरचे सन २००१६-१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण उपसंचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षण कार्यालय औरंगाबाद यांचेकडून लेखापरीक्षण झाले असून, लेखापरीक्षण अहवाल या कार्यालयास दि.२७/०४/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर दोन वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालात एकूण १३१ परिच्छेद समाविष्ट आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर मा. आयुक्त यांनी तीन महिन्याच्या आत तो अहवाल मा. सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्याची तरतूद आहे.

तसेच स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमानुसार लेखापरीक्षण अहवालावर आवश्यक ती कार्यवाही मा. आयुक्त यांनी करावे अशीही तरतूद उक्त कलमात नमूद आहे. सदर तरतुदींच्या अनुषंगाने व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० (सुधारणा २०११) चे कलम १०(१) अन्वये लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदाचे प्रथम अनुपालन अहवाल अहवाल प्राप्त झाल्यापासून चार महिन्याच्या आत स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाकडे पाठविणे अनिवार्य आहे.

वर नमूद अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने स्थानिक निधी लेखापरीक्षण अहवाल वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मा. सर्वसाधारण सभेपूढे/मा. प्रशासक ठेवणेसाठी व अनुपालन अहवाल उपसंचालक(मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षण कार्यालय यांचेकडे पाठविणेसाठी मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा आयुक्त यांचेकडे सादर होणे योग्य.

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

निर्णय:-

उपसंचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय औरंगाबाद यांचेकडून लातूर शहर महानगरपालिका, लातूरचे सन २०१६-१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला असून सदरील अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०७(अ) अन्वये सदर लेखापरीक्षण अहवाल मा. सर्वसाधारण सभेपूढे ठेवलेली आहे. तरी याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षण अधिनियमातील तरतुदींनुसार अहवालातील परिच्छेद, आक्षेप अनियमितता बाबत आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करण्यास ही महानगरपालिका सर्वसाधारण सभा तथा प्रशासक मान्यता देत आहे व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासकीय ठराव

ठराव क्रमांक :- 123 दिनांक 14/06/२०२३

विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत कामास मंजूरी देणे बाबत.

<u>प्रस्तावना –</u> नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.३६२/नवि-१६ दिनांक ०८ फेब्रुवारी २०२३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद सन २०२२-२३ साठी (लेखाशिर्ष (२२१७०९३) अंतर्गत लातूर महानगरपालिका क्षेत्रातील महाराणा प्रताप नगर येथील पाणंद रस्ता २३१ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी रु. १,००,००,०००/- कोटी निधी मंजूर केला आहे. शासन निर्णयानुसार कार्यान्वयण यंत्रणा लातूर शहर महानगरपालिका असल्याने सदर काम करणेसाठी महाराणा प्रताप नगर गामपंचायतीने काम करणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय. किंमत
१	लातूर महानगरपालिका क्षेत्रातील महाराणा प्रताप नगर येथील पाणंद रस्ता २३१ मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.	१,००,००,०००.००
	एकूण रुपये	१,००,००,०००.००

तरी वरीलप्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

निर्णय – वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास काम महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद अंतर्गत सन २०२२-२०२३ साठी प्राप्त होणा-या निधीमधून हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासकीय विषय क्रं.--~~124~~------ठराव क्रं.------~~124~~---------- दिंनाक 16/06/२०२३

विषयः- मा.प्रशासक यांच्याकडे प्रस्ताव सादर.

"लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकर वसूली, देखभाल व दुरूस्तीसाठी सॉफ्टवेअर सह ऑन लाईन व इतर ५३ सेवा पुरवणे. बाबत तसेच एचडीएफसी बॅंकेसोबत झालेला द्विपक्षीय करारनामा रद्द करण्याबाबत विषय विचार विनिमय करून निर्णय घेण्यास्तव सादर."

प्रस्तावनाः-

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकर वसूली व देखभाल,दुरूस्तीसाठी तसेच ऑन लाईन मालमत्ताकराचा भरणा करून घेण्यासाठी एचडीएफसी बॅंकेमार्फत ऑसेटेंक एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती.पंरतू शासनाने निर्गमित केलेल्या ५३ सेवा नागरीकांना पुरवण्याबाबत बॅंकेस वारंवार विचारणा करण्यात आली असता या सेवा पुरवण्याच्या बदल्यात बॅंकेमध्ये अतिरिक्त ठेवी ठेवल्याशिवाय ५३ सेवा पुरवण्याचा प्रस्ताव मान्य करता येत नाहीत असे बैठकीमध्ये चर्चेअंति सांगण्यात आले आहे. त्यानुसार सदर सेवा पुरवण्याबाबत असमर्थता दर्शीविल्यामुळे सदर बॅंकेसोबत झालेला द्विपक्षीय करारनामा रद्द करणे योग्य होईल.

तसेच उपरोक्त सेवा पुरवण्याबाबत इंडियन बॅंक यांनी या कार्यालयाकडे २९/०३/२०२३ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून कर संकलन विभागाचे व शासनाने निर्गमित केलेल्या ५३ सेवा, हॅंन्ड डिव्हाईसेस प्रिंटरसह (एकुन ४० नग) व सिएसआर फंडामधुन इतर कामे विनामुंल्य करून देण्याचे मान्य केले असून एचडीएफसी बॅंकेमार्फत या पूर्वी झालेला द्विपक्षीय करानामा रद्द करून इंडियन बॅंकेसोबत करारनामा करणे योग्य होईल.

तरी उपरोक्त प्रमाणे सदरचा विषय मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

प्रशासकिय निर्णय-

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताकर वसूली व देखभाल,दुरूस्तीसाठी तसेच ऑन लाईन मालमत्ताकराचा भरणा करून घेण्यासाठी एचडीएफसी बॅंकेमार्फत ऑसेंटेक एजन्सीची नियुक्ती करण्यात आली होती.सदर सेवा पुरवण्याबाबत असमर्थता दर्शीविल्यामुळे सदर बॅंकेसोबत झालेला द्विपक्षीय करारनामा रद्द करण्यात यावा व उपरोक्त इंडियन बॅंकेने सादर केलेल्या प्रस्तावास विनामुंल्य सेवा घेण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.व त्यांच्यासोबत ,द्विपक्षीय करारनामा करून घेण्यासाठी उपायुक्त कर संकलन विभाग व मुख्यलेखाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 125 दि. 22/06/२०२३

विषय – ९००० क्षमतेचे २ वॉटर टँकर खरेदी करणे बाबत.

प्रस्ताव –

शासन निर्णय स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत २०१८ प्र.क्र १७५ नगर विकास ३४ दि.१२ एप्रिल २०१८ च्या मान्यते नूसार लातूर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन DPR ला मान्यता प्राप्त असून, त्यानूसार DPR 2018 अ.क्र २१ नूसार ९००० क्षमतेचे २ वॉटर टँकर खरेदी करणे करीता. मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे मान्यतेनूसार दि.०२.०३.२२३ रोजी GEM पोर्टलवर निवीदा प्रकाशीत करण्यात आली होती. निवीदा क्र. GEM/2023/B/3214860 च्या विहीत वेळेत ३ निवीदा धारक प्राप्त झाले आसून १ निवीदा धारक अपात्र झाल्याने पात्र २ निवीदाधारकांचा लिफाफा दि.३०.०५.२०२३ रोजी उघडण्यात आला तरी सदर निवीदेमध्ये दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	रक्कम
१	MEGNUM HEALTH WORLD	71,51,150/-
२	VENKATESHWAR ENTERPRISES	69,51,150/-

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी **VENKATESHWAR ENTERPRISES** चे दर प्रति नग ३४,७५,५७५/- अशे एकूण रू. ६९,५१,१५०/- (अक्षरी एकोणसत्तर लक्ष ऐकावन्न हजार एकशे पन्नास रूपये फक्त) सर्वात कमी असून **VENKATESHWAR ENTERPRISES** यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – ९००० क्षमतेचे २ वॉटर टँकर खरेदी करणे या कामासाठी सर्वात कमी दर **VENKATESHWAR ENTERPRISES** चे दर प्रति नग ३४,७५,१५०/- अशे एकूण रू. ६९,५१,१५०/- यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव

लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकिय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 126 दि.22/06/२०२३

विषय – ८ मोबाईल टॉयलेट खरेदी करणे बाबत.

प्रस्ताव –

शासन निर्णय क्र. सवमअ-२०२३/प्र.क्र-३८(१)/नवि-३४ नूसार लातूर शहर महानगरपालिकेसाठी ८ मोबाईल टॉयलेट खरेदी करण्या करीता रू. ५२,२६,७२०/- अक्षरी (बावन्न लक्ष सहवीस हजार सातशे वीस रू) ची मंजूरी मिळाली होती व हि रक्कम स्वचछ महाराष्ट्र अभियान -१ मधील Community Toilet मधील रू. १,२०,९८,६११/- अक्षरी (एक कोटी वीस लक्ष अठ्यान्नव हजार सहाशे अकारा रू) मधून खर्च करण्याची मंजूरी नूसार दि.२३.०३.२०२३ रोजी ८ मोबाईल टॉयलेट खरेदी करणे करीता GEM PORTAL वर निवीदा प्रकाशीत करण्यात आली. सदर निवीदेस एकूण १४ निवीदाधार प्राप्त झाले असून त्यापैक ३ निवीदा धारक पात्र झाले असून पात्र ३ निवीदाधारकांचे २ लिफाफा (आर्थीक) दि.२३.०५.२०२३ रोजी उघडण्यात आला. सदर निवीदेमध्ये सर्वात कमी दर **S.S. ENTERPRISE** चे प्रति नग रू. ५,७५,३००/- असे एकूण ८ नगाचे ४६,०२,४००/- असून सदर दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र	कंत्राटदाराचे नाव	रक्कम
१	S S ENTERPRISES	4602400/-
२	MEERA STEEL FABRICATION & Fibers	5208000/-
३	NEW SAI FIBER	5224000/-

तरी प्राप्त निवीदाधारका पैकी **S.S. ENTERPRISE** चे दर प्रति नग रू. ५,७५,३००/- असे एकूण ८ नगाचे ४६,०२,४००/- (अक्षरी सेहचाळीस लक्ष दोन हजार चारशे फक्त) सर्वात कमी असून **S.S. ENTERPRISE** यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – ८ **मोबाईल टॉयलेट खरेदी करणे** या कामासाठी सर्वात कमी दर **S.S. ENTERPRISE** चे दर प्रति नग रू. ५,७५,३००/- असे एकूण ८ नगाचे ४६,०२,४००/- (अक्षरी सेहचाळीस लक्ष दोन हजार चारशे फक्त) असून यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रधानमंत्री आवास योजना

प्रशासकीय विषय क्रमांक ---127----- ठराव क्रमांक -127--- दिनांक 28 /06/2023

<u>प्रस्ताव</u> -

मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR यादीसोबत महानगरपालिकेचा ठराव सोबत सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर शहरामध्ये योजनेच्या BLC घटकामध्ये नविन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. BLC घटकाच्या प्रथम DPR 5 मध्ये 345 लाभार्थ्यापैकी 210 लाभार्थ्यानी काम सुरू केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे बांधकाम सुरू करणेकरीता वारंवार भ्रमनध्वनी तसेच नोटीसव्दारे कळविण्यात आलेले होते. परंतू कांही लाभार्थ्यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही व कांही लाभार्थ्यांनी कांही कारणामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यामुळे त्या लाभार्थीचे नावे Curtailment करून शासनास सुधारीत DPR सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. DPR 5 मध्ये 210 लाभार्थ्यांनी काम सुरू केल्याने त्यांची नावे कायम ठेवून उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळून (Curtailment) DPR सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने DPR 5 मधील 210 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>प्रशासकीय निर्णय</u> - वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR 5 मधील 210 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रधानमंत्री आवास योजना

प्रशासकीय विषय क्रमांक ----128----- ठराव क्रमांक -128--- दिनांक 28 /06/2023

<u>प्रस्ताव</u> -

मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR यादीसोबत महानगरपालिकेचा ठराव सोबत सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. लातूर शहरामध्ये योजनेच्या BLC घटकामध्ये नविन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. BLC घटकाच्या प्रथम DPR 6 मधील 1250 लाभार्थ्यापैकी 758 लाभार्थ्यानी काम सुरू केले आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी घेऊन घरकुलाचे बांधकाम सुरू करणेकरीता वारंवार भ्रमनध्वनी तसेच नोटीसव्दारे कळविण्यात आलेले होते. परंतू कांही लाभार्थ्यांनी त्यास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही व कांही लाभार्थ्यांनी कांही कारणामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.त्यामुळे त्या लाभार्थींचे नावे Curtailment करून शासनास सुधारीत DPR सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. DPR 6 मधील 758 लाभार्थ्यांनी काम सुरू केल्याने त्यांची नावे कायम ठेवून उर्वरित लाभार्थ्यांची नावे वगळून (Curtailment) DPR सादर करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने DPR 6 मधील 758 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मा.प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

<u>प्रशासकीय निर्णय</u> - वरील सादर झालेल्या प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत, मा.उप-सचिव ,महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ,मुंबई यांचे पत्र दिनांक 20 जानेवारी 2023 नुसार प्रस्तावित Curtailment साठी DPR 6 मधील 758 लाभार्थ्यांचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका , लातूर

दिनांकः 17/07/2023

<u>प्रशासकीय ठराव क्र.</u> 129 अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे MULTIPURPOSE FIRE TENDER खूलि चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दरपत्रक मागविणेत आले आसता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे निविदा दर मंजूर करणे बाबत..

प्रस्तावः-

जिल्हा वार्षिक योजना सन 2022-23 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रू.1,57,50,000 निधी उपलब्ध करून देण्यातआलेला आहे.तसेच मा.जिल्हाधिकारी लातूर यांनी पत्र क्र.2023/नपाप्र/अग्नि./कावि-426 दि.30.03.2023 अन्वये या कार्यालयास वितरित केलेले अग्नि- -शमन अनुदान रक्कम रु.1,57,50,000 रुपयास प्रशाकिय मान्यता प्रदान केले आहेत.

तसेच मा.आयुक्त लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांनी शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तिचे व वित्तीय अधिकाराचे तसेच मा.संचालक,अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासन यांचे तांत्रिक मान्यतेच्या अटी व शर्तिचे काटेकोर पालन करणे व ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत कळविले आहेत त्यानुसार प्रशाकिय मान्यता प्राप्त झाले प्रमाणे ई- निविदा मागविणेत आले असता एकूण 03 निविदाधारकांनी (ठेकेदारांनी) सहभाग नोंदविले त्यात NIDHI ENTERPRISES, MUMBAI यांचे दर सर्वात कमीचे आसुन वाटा-घाटीने दररचा तपसिल खलिल प्रमाणे.

आ. क्र.	कंपनीचे नाव ⟹ / वाहनाचा तपसिल ⇩	NIDHI ENTERPRISES, MUMBAI		शेरा
		प्राप्त निविदेतील दर "A"	वाटाघाटीने कमी केलेले दर "B"	
1	2	3	4	5
1	Design, Construction, Fabrication Erection, Testing and Commissi- -oning of Fire Water cum Foam Tender on 19 Ton GVW BS-VI Chassis for Fire Services of Latur City Municipal Corporation (including Chassis).	1,59,10,000/-	1,57,00,000/-	

तरी प्रस्तावित प्रस्तावाप्रमाणे कॉलम क्र. 04 प्रमाणे वाटाघाटीने कमी केलेले दरपत्रक रू.1,57,00,000/- खर्चास अर्थिक व प्रशासकिय मान्यतेसह खर्च करणेच्या मंजूरीस्तव सादर.

<u>निर्णयः-</u> अग्निशमन विभागासाठी अत्याधूनिक आसे MULTIPURPOSE FIRE TENDER खूलि चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दरपत्रक मागविणेत आले आसता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे निविदा दर रक्कम रू. 1,57,00,000/- खर्च करणेस मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रमांक - 130 दि. 18/07/2023

विषय -लातूर शहर पाणी पुरवठा योजना,धनेगाव हेडवर्क्स, हरंगुळ जलशुध्दिकरण केंद्र,साई हेडवर्क्स, आर्वी जलशुध्दिकरण केंद्र व पंपहाऊस येथील (विदयुत/ यांत्रिकी) वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.

प्रस्ताव

लातूर शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत धनेगाव हेडवर्क्स, हरंगुळ जलशुध्दिकरण केंद्र,साई हेडवर्क्स, आर्वी जलशुध्दिकरण केंद्र व पंपहाऊस येथील वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेसाठीच्या बाबीचे दर ई-निविदा सुचना क्र.04/2023-24 निविदा आय डी क्र.2023_896728_1 मागविण्यात आली होती निविदा बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

1. निविदा मागविलेला कालावधी दि. 21.04.2023 ते 15.05.2023 निविदा उघडण्याचा दि.16.05.2023
2. मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त असल्याचे बीड रिपोर्ट वरून निर्दशनास आलेनुसार दि.16.05.2023 रोजी निवीदाचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. तीन निविदाधारकाचे कागदपत्राची छाननी केले नंतर तीन्ही निविदा पात्र असल्याने निविदाचा आर्थिक लिफाफा दि.25.05.2023 रोजी उघडण्यात आला.
3. प्राप्त निविदा दराबाबतची माहिती खालील विवरणामध्ये सादर करण्यात येत आहे.

अ.क्र	निविदाधारकाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	प्राप्त दर
1	मे. आश्विनी इलेक्ट्रीकल्स, लातूर	1,68,48,778/-	4% जास्तीने रक्कम रू.1,75,22,729.120
2	मे. लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर		2% जास्तीने रक्कम रू.1,71,85,753.56
3	मे. साई इलेक्ट्रीकल,लातूर		5% जास्तीने रक्कम रू.1,76,91,216.900

वरील प्रमाणे तीन निविदाधारकाचे दर प्राप्त झाले असुन प्राप्त निविदा दरापैकी सर्वात कमीचे दर **मे. लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर** यांचे अंदाजपत्रक रक्कम रू.1,68,48,778/- पेक्षा 2% जास्तीने म्हणजे 1,71,85,753.56 रूपये आहे. मात्र वाटाघाटी अंती निविदाधारकाने अंदाजपत्रकीय दराप्रमाणे काम करण्यास लेखी सहमती दिलेली आहे.

निर्णय –

लातूर शहर पाणी पुरवठा योजना धनेगाव हेडवर्क्स,हरंगुळ जलशुध्दिकरण केंद्र,साई हेडवर्क्स, आर्वी जलशुध्दिकरण केंद्र व पंपहाऊस येथील (विदयुत/ यांत्रिकी) वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेच्या कामासाठी **मे.लक्ष्मी इंजिनीअरींग,चाकूर** यांचे अंदाजपत्रकीय दरास प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी प्रशासकीय ठरावानुसार त्वरीत कार्यवाही करावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. 131 दिनांक. 19/11/2023

विषय क्र.

विषय :- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,महानगरपालिका शाळा क्र.09 येथील कंत्राटी स्वरुपात कार्यरत तीन (03) शिक्षकांना मुदतवाढ देणे बाबत.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,महानगरपालिका शाळा क्र.09 येथील इयत्ता 9 वी 10 वी वर्गाला अध्यापन करण्याकरीता असलेले 1. श्री. दिवे विलास माधवराव, 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान , 3. श्रीमती जयळगेकर ज्योती बालाजी ,या तीन कंत्राटी शिक्षकांना शैक्षणीक वर्ष सन 2022-23 साठी दि. 21/07/2022 च्या ठराव क्र.23 अन्वये मंजुरी देण्यात आली होती.

तरी याही वर्षी चालू शैक्षणीक वर्षाकरीता वरील शिक्षकांना सन 2023-2024 साठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी लातूर शहर महानगरपालिका शाळा क्रमांक 9 येथील तीन कंत्राटी शिक्षकांना दि.2 जुन 2023 ते 30 एप्रिल 2024 पर्यंत मुदतवाढ देणेबाबतचा पस्ताव सादर.

निर्णय:

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,महानगरपालिका शाळा क्र.09 येथील इयत्ता 9 वी 10 वीच्या वर्गासाठी कंत्राटी स्वरुपात नियूक्त असलेले सहशिक्षक 1. श्री. दिवे विलास माधवराव, 2. श्रीमती पठाण जबीन अब्दुल रहेमान , 3. श्रीमती जवळगेकर ज्योती बालाजी ,यांना शैक्षणिक वर्ष सन 2022-23 साठी देण्यात आलेली मुदत दि. 30.04.2023 रोजी संपली असल्याने शैक्षणिक वर्ष 2023-24 करीता उक्त तीन (03) कंत्राटी शिक्षकांना दि.02 जून 2023 ते 30 एप्रिल 2024 पर्यंत मूदतवाढ देण्याबाबतच्या प्रस्तावास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 132 दिनांक-25/ 07 / 2023

<u>विषयः</u>- ई-निवीदा क्र. 06/2023-2024 अन्वये मागविण्यांत आलेल्या निवीदावर विचार विनीमय करुन घेणे बाबत.

प्रस्तावना-

मा.जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांचे प्रमा.आदेश क्र.2023/नपाप्र/नागरी दलितेत्तर/कावी-479 दि. 31.03.2023 अन्वये **नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गतच्या एकुण 132** कामासाठी एकुण अं.प.रु. 14,92,41,884/- ला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने ई-निवीदा सुचना क्र.06/2023-2024 अन्वये खालील 03 कामांच्या एकत्रित रुपये-2,02,37,560/- किंमतीची ई-निवीदा प्रणालीद्वारे निवीदा प्रसिध्द करण्यांत आली होती.

अ.क्र.	कामाचे नाव	प्र.मा.किंमत
1.	पद्मानगर येथे क्षेत्रिय कार्यालय क्र. ए बांधणे	83,29,000.00
2.	ठाकरे चौक येथे क्षेत्रिय कार्यालय क्र. बी बांधणे	87,88,000.00
3.	महानगरपालिकेच्या पश्चिम दिशेला फायर फायटींग सेंटर इमारत बांधणे.	80,32,000.00

त्यानुसार सदर कामांसाठी खालील 03 (तिन) निवीदाधारक सहभागी झाले होते.

(1) ए.के.कन्स्ट्रक्शन, लातूर.

(2) ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर

(3) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद

वरिल एजन्सीधारकांच्या लिफाफा क्र.01 (कागदपत्र) दि.28.06.2023 रोजी उघडून कागदपत्रांची तांत्रिक तपासणी करत असताना निवीदा समितीने (1) ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर (2) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांनी निवीदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केले नसल्याने अपात्र करुन दोन्ही निवीदाधारकाकडून तात्काळ कागदपत्रे मागवून घेणे बाबत अभिप्राय दिलेवरुन निवीदाधारक (1) ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर यांना कार्यालयीन पत्र क्र. 4099/2023-24 दि.07.07.2023 रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार SCADA enabled Reversible Drum Type Concrete Mixer कागदपत्रे सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. तरी आपण दि.11.07.2023 पर्यंत सदर कागदपत्र सादर करावे असे कळविण्यांत आले होते. परंतू विहीत मुदतीत निवीदाधारक ए.आर.कन्स्ट्रक्शन, लातूर यांनी कागदपत्रे सादर न केलेने अपात्र करण्यांत आले. तसेच (2) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांना कार्यालयीन पत्र क्र. 4100/2023-24 दि.07.07.2023 रोजी पत्र देऊन आपण निवीदेतील अटी व शर्तीनुसार खालील कागदपत्रे सादर केले नसल्याने आपणांस अपात्र करण्यांत आले आहे. (1) Statement-I (Work in Hand), (2) Statement-III (Similar Type work year-2015-16, 16-17, 17-18, 18-19, 19-20, 20-21, 21-22) (3) Statement-IV (Technical Staff) (4) Quantities Certificate (5) Own Water Tanker (6) Truck/Tipper (own/higher) (7) Bid Capacity तरी आपण

Scanned with OKEN Scanner

दि.11.07.2023 पर्यंत सदर कागदपत्रे सादर करावे असे कळविण्यांत आले होते. त्यानुसार निवीदाधारक सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांनी दि.10.07.2023 रोजी लेखी पत्र देऊन पत्रासोबत सदर कागदपत्रे सादर केली असल्याने त्यांना पात्र करण्यांत आले.

त्यानुषंगाने पात्र निवीदाधारक (1) ए.के. कन्स्ट्रक्शन, लातूर व (2) सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांचा लिफाफा क्र.02 (देकारपत्रक) दिनांक- 11.07.2023 रोजी उघडण्यांत आला. निवीदाधारक यांनी सदर कामासाठी खालील प्रमाणे दर दिले आहेत.

<u>कामाचे नावः- नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत-</u>

Proposed Costruction of Zone A Office at Padma Nagar and Zone B Office at Thakare Chowk and Proposed Development of Fire Fighting Center Building at West side of Municipal Corporation Latur Premise for M.C.Latur. Rs. 2,02,37,560/- Tender ID No.2023_LMC_907506_1

अ.क्र.	निवीदाधारकाचे नांव	निवीदेत दिलेले दर
1.	ए. के. कन्स्ट्रक्शन, लातूर	अंदाजपत्रक दरापेक्षा 2.000% अधिक
2.	सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद	अंदाजपत्रक दर

सदर कामासाठीचे न्युनतम (L1) निवीदाधारक सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांची अंदाजपत्रक दराची निवीदा मंजूर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

तसेच सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात करतेवळी अंदाजपत्रकातील कांही बाबीमध्ये वाढ/घट झाल्यास त्यासही मान्यता मिळावी. तसेच क्षेत्रिय कार्यालय क्र.ए साठी सदर ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यास इतर ठिकाणी बांधणेस मान्यता व्हावी.

<u>निर्णयः-</u> Proposed Costruction of Zone A Office at Padma Nagar and Zone B Office at Thakare Chowk and Proposed Development of Fire Fighting Center Building at West side of Municipal Corporation Latur Premise for M.C.Latur. Rs. 2,02,37,560/- Tender ID No.2023_LMC_907506_1 या कामासाठीची सर्वात कमी दराची (L1) निवीदा सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांची अंदाजपत्रक दराची असल्याने निवीदाकार सय्यद राशेद सरताज, उस्मानाबाद यांनी निवीदेत दिलेल्या दरास मान्यता देण्यांत येते.

तसेच सदर कामाची प्रत्यक्ष सुरुवात करतेवळी अंदाजपत्रकातील कांही बाबीमध्ये वाढ/घट अथवा बदलास तसेच जागेत बदल झाल्यास त्यासही मान्यता देण्यांत येते.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्र. 133 दि. 21/07/2023

विषयः- खर्चास / खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावः- सन 2016-2017 ते 2017-2018 या वर्षाच्या मनपाच्या लेखापरिक्षण अहवालात परिच्छेद क्र. 68, 105,106 व 107 मध्ये खालील प्रमाणे आक्षेप नोंदविले आहेत.

परिच्छेद क्र. 68, मनपातील विविध कार्यक्रम पत्रिका छपाई करण्यातील अनिमितता. खर्च रक्कम-168,300/-

सदर आक्षेपात जाहिरात वर्तमान पत्रात देणे आवश्यक असताना दिलेले नाही, संकेत स्थळावर नोटीस प्रसिध्द केले नाही. तसेच दरपत्रके मागविले नाही, असे आक्षेप नोंदविले आहे.

परिच्छेद क्र. 105, समिती नेमप्लेट बनविण्याबाबत. खर्च रक्कम- 6750/-

सदर आक्षेपात दरपत्रके मागविले नाहीत, असा आक्षेप नोंदविला आहे.

परिच्छेद क्र. 106, निमंत्रण पत्रिका खर्चातील अनिमितता. खर्च रक्कम- 19800+19800=39600/-

सदर आक्षेपात दरपत्रके मागविले नाहीत, असा आक्षेप नोंदविला आहे.

परिच्छेद क्र. 107, चांदीचे कडे, मानाचा फेटा, केसरीब्लेट खरेदीतील अनिमितता. खर्च रक्कम- 22851/-

सदर आक्षेपात दरपत्रके मागविले नाहीत, असा आक्षेप नोंदविला आहे.

वरिल सर्व परिच्छेदामध्ये दरपत्रके न मागविता खरेदी केल्याचा आक्षेप नोंदविला आहे. कार्यक्रम पत्रिका/ निमंत्रण पत्रिका छपाई कार्यक्रम अचानक ठरविल्याने दरपत्रके न मागविता छपाई केलेली आहे. तसेच समितीचे नेमप्लेट खर्च अल्पप्रमाणात असल्यामुळे तातडीने नेमप्लेट बनविणे आवश्यक असल्याने दरपत्रके न मागविता नेमप्लेट तयार करण्यात आलेले आहेत आणि चांदीचे कडे लातूर मधील चांदीचे प्रसिध्द व व्यवसायाची नोंदणी केलेल्या नोंदणीधारक व्यवसायीक लक्ष्मीकांत ताथोडे यांच्याकडून खरेदी केलेली आहे. त्यामुळे दरपत्रक मागविण्यात आलेले नाही.

तरी वरील सर्व प्रकरणातील खर्च दरपत्रके न मागविता केल्यामुळे सदर प्रकरणातील खर्चास/खरेदीस कार्यात्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समितीकडे मंजूरीस्तव सादर.

निर्णयः- परिच्छेद क्र. 68, 105,106 व 107 अन्वये दरपत्रके न मागविता केलेल्या खर्चास/खरेदीस कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशाकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

स्वच्छता विभाग

ठराव क्र 134 दिनाक 24/07/2023

वाचावे - १. शासन निर्णय क्रं.एफएफसी २०२०/प्र.क्रं.५६/नवि-४ दिनांक २८ ऑक्टो २०२०

२. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्रं. संकिर्ण-२०२१/प्र.क्रं.६४/ नवि-४ दि. १२ ऑक्टो २०२१

३ . विभाग प्रमुख स्वच्छता विभाग यांचा प्रस्ताव दिनांक ___.०५. २०२३

प्रशासकीय मंजुरीचे आदेश -

प्रस्ताव -

लातूर शहर महानगरपालिकेने , स्वच्छ भारत अभियान च्या सविस्तर प्रकल्प अहवाल DPR- 2018 अंतर्गत बायोगॅस 5 टन प्रतीदिन बायोगॅस प्रकल्प उभारणी करणे होते. परंतु लातूर शहर महानगरपालिकेच्या गरजे नुसार शहरातील ओल्या कचऱ्या पासून विकेन्द्रित पद्धतीने प्रक्रिया करणे करिता 3 तीन विकेन्द्रित बायोगॅस प्रकल्प उभारणी करिता महाराष्ट्र शासनाकडे दिनाक 10 जून 2021 रोजी व दिनाक 13 जुलै 2021 रोजी महानगर पालिका ठराव, जागा मालकीचे ८ अ आणि अंदाजपत्रकाचे २ प्रती संहित सुधारित प्रस्ताव राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना पाठविला होता. सदरील प्रस्तावा करिता महाराष्ट्र शासन निर्णय स्व- २०१८/ प्र क्र १७५/ न वि -३४ दिनाक ८ फेब्रुवरी २०२२ रोजी स्क्रॅप मार्केट , फ्रूट मार्केट आणि गांधी चौक येथे तीन विकेन्द्रित पद्धतीने प्रकल्प राबविन्य करिता मान्यता मिळाली.

वरील प्रकल्प करिता गांधी चौक स्क्रॅप मार्केट आणि फ्रूट मार्केट १ टन प्रतीदिन बायोगॅस करिता कार्यादेश जा.क्र./ला.श.म.न.पा./ पा.पू. / ५०१८ / २०२१-२२ , दिनाक ०८/०८/२०२३ रोजी सायुज्य ऊर्जा प्रा लि, नांदेड यांना देण्यात आले आहेत. या प्रकल्पा द्वारे वीज निर्मिती करून, प्रकल्पा लागटचे ग्रीन बेल्ट, दुकाने व परिसर प्रकाशित करून नागरिकांसाठी विकसित करणे प्रस्तावित आहे.

वरील प्रकल्पापैकी गांधी चौक येथी काम ९० % पूर्ण आहे, फ्रूट मार्केट येथील काम ३०% पूर्ण आहे. पण स्क्रॅप मार्केट येथील प्रकल्प उभारणी करिता दिनाक १६/ ०२/२०२३ रोजी परिसरातील स्थानिक रहिवासी कडून विरोध दर्शविला आहे.

वरवंटी डेपो येथील ५००० SQFT जागा लागणार असून उपलब्ध आहे. तरी सदरील प्रकल्प वरवंटी डेपो येथे स्थलांतरील करणे करिता मान्यतेस्तव.

निर्णय : वरवंटी डेपो येथील ५००० SQFT जागा लागणार असून उपलब्ध असल्याने बायोगॅस प्रकल्प स्थलांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

Scanned with OKEN Scanner

प्रशासकीय ठराव

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक 135 दिनांक 3/8/२०२३

प्रस्तावः-

